# मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल, २०२६
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष सव्विसावे
अंक चौथा



## जागतिक पुस्तक दिन




## विचार-ज्ञानसमृद्धतेची खात्री
## करू पुस्तकांशी मैत्री



## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# ‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’



‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती. या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**

**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**

**₹ २०,०००/-**

## पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२५ ते ३० सप्टेंबर, २०२६ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२६ मध्ये केली जाईल. १२ जानेवारी, २०२७ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

♦एप्रिल २०२६ ♦वर्ष सव्विसावे ♦अंक चौथा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
अंजली पटवर्धन

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

मेहता पब्लिशिंग हाउस


## – अनुक्रमणिका –


| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| साहित्य वार्ता | १० |
| पुरस्कार | १२ |
| श्रद्धांजली | १४ |
| विशेष लेख | १६ |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| द हिडन हिंदू | २० |
| थर्ड मॅन | २६ |
| डिलिव्हरिंग हॅपिनेस | ३८ |
| हिटलर आणि भारत | ४४ |
| हारिक | ५२ |
| दिनविशेष | ६२ |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com



'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

# संपादकीय

## पुस्तकं : ज्ञानसागर - विचारांचा जागर

एप्रिल महिन्यात, २३ तारखेला ‘जागतिक पुस्तक दिन’ साजरा केला जातो, हे आपण जाणतोच. जगद्विख्यात साहित्यिक विल्यम शेक्सपिअर यांच्या स्मृतिदिनानिमित्त हा दिवस साजरा करण्यात येतो. अर्थात, केवळ ‘पुस्तकं’च नाहीत; तर एकूणच ‘लेखन’, ‘प्रकाशन’ यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या वेळी केला जातो. इथेच पुस्तकांचं अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित होतं. त्यात विविध आशय-विषयांधारित पुस्तकांचा समावेश आहे.

अर्थात, ‘पुस्तकां’चा विचार करताना त्यामधली सर्वसमावेशकता, व्यापकता या बाबी विचारात घ्याव्या लागतात; कारण प्रत्येक पुस्तक काही ना काही सांगतं. म्हणजे, निखळ वाचनानुभव देणारी काही पुस्तकं असतात. त्यांची मांडणी, शब्दरचना, त्यातले हलकेफुलके आशय-विषय वाचकांना विशेष भावतात; मात्र त्याबरोबरच, जाणीवपूर्वक विशिष्ट विचारांची पेरणी असलेली, त्या दृष्टीने मानवी जाणिवा समृद्ध करणारी अशीही काही पुस्तकं असतात. वाचकांना वाचनाचा आनंद देण्यासहित ती अंतर्मुख

करणारी असतात. 'साहित्य हा समाजाचा आरसा आहे,' असं जे साहित्याच्या बाबतीत म्हटलं जातं, त्याचा प्रत्यय देणारी ही पुस्तकं असतात. म्हणजे, एक 'कलाप्रकार' या दृष्टीने निखळ आनंद देण्यासोबतच 'समाजभान' विकसित करण्याच्या दृष्टीनेही काही पुस्तकं अमूल्य योगदान देतात.

या पार्श्वभूमीवर, 'पुस्तक नक्की काय देतं' याचा विचार करताना अनेक पैलू आपल्यासमोर येतात. वाचकांच्या मनाला आणि विचारांना समृद्ध करण्यासहित ती त्यांच्या जीवनाला नवी दिशा देतात. तसंच, ज्ञानाचं नवं विश्व आपल्यासमोर उलगडतं. या दृष्टीने, इतिहास, कला-संस्कृती, विज्ञान, तसंच विविध भावभावना अधोरेखित करणारी पुस्तकं असं सर्व विषय-स्पर्शित्व वाचक अनुभवतात.

सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, वेगवेगळ्या वाचकवर्गानुसार वेगवेगळा आशय प्रतीत करणारी पुस्तकं असतात. वाचनानुभवाचा बदलता स्तर तिथे दिसतो. उदाहरणादाखल सांगायचं, तर अगदी लहान मुलं जेव्हा पुस्तक हातात धरतात, तेव्हा त्यातून ती वेगवेगळे नवीन शब्द शिकतात. नवीन गोष्टी शिकतात. अशा प्रकारे त्यांची शब्दसंपत्ती वाढत असतानाच, त्याद्वारे त्यांचा बौद्धिक विकास नकळत साधला जाण्यात हातभार लागतो. विविध वयोगटांतल्या विद्यार्थिवर्गाला त्या-त्या विशिष्ट स्तरावर पुस्तकं मार्गदर्शन करतात. म्हणजे, विविध प्रकारच्या स्पर्धा-परीक्षा देणाऱ्यांसाठी पुस्तकं हाच त्यांचा मोठा आधार असतो. तरुण पिढीसाठी त्यांच्या जाणिवा विकसित करण्याच्या दृष्टीने पुस्तकं प्रेरक ठरतात. त्यांच्या समग्र जडणघडणीत महत्त्वाची भूमिका निभावतात. वाचकांच्या ठायी सकारात्मकता व आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यासाठी, तसंच कल्पनाशक्ती विकसित करण्याच्या दृष्टीने ती प्रेरणादायी ठरतात. एकूणच, 'ज्ञानोमयं आत्मा' ही अनुभूती देण्याच्या अनुषंगाने, वाचकांच्या बौद्धिक-वैचारिक जाणिवांचा स्तर उंचावतात. त्या वेळी पुस्तकांद्वारे मानवी जीवनाचा अनाहताशी गोफ गुंफला जातो. तो आपल्या वैश्विक जाणिवा समृद्ध करतो.

या पार्श्वभूमीवर, मेहता पब्लिशिंग हाऊसची सर्वच पुस्तकं सर्वच दृष्टींनी लक्षवेधी असल्याचं जाणवतं. विविध आशय-विषयांना समर्पित अशी सर्व पुस्तकं वाचकांच्या एकूणच जीवनकक्षा विस्तारणारी आहेत. ती पुस्तकं वाचकांच्या व्यक्तित्वाला बहुआयामित्व प्रदान करतात. विविध प्रकारची

ललितलेखनात्मक पुस्तकं- कथासंग्रह, कादंबरी, चरित्र-आत्मचरित्र, तसंच अनुवादित पुस्तकं त्या दृष्टीने विशिष्ट अनुभूती देतात. त्यांमध्ये काही पुस्तकांचा व लेखकांचा प्रकर्षाने उल्लेख करता येईल. 'जीवनासाठी कला' हे तत्त्वज्ञान साहित्यातून मांडणारे, ज्ञानपीठ पुरस्कार-विजेते लेखक वि.स.खांडेकर- त्यांचं 'ययाति' हे पुस्तक. कलात्मक आनंदासहित समाजजागृतीचा व नैतिकतेचा संदेश त्यांची पुस्तकं देतात. तर, प्रसिद्ध साहित्यिक रणजित देसाई यांनी कादंबरीलेखनाद्वारे इतिहास जिवंत केला आहे. सिद्धहस्त लेखक व्यंकटेश माडगूळकर यांची पुस्तकं ग्रामीण जीवनाचं वास्तववादी चित्रण करणारी आहेत. निसर्गभान देणारी आहेत. त्याचप्रमाणे, सुप्रसिद्ध साहित्यिक आनंद यादव यांचं लेखन ग्रामीण जीवनातील वेदना आणि संघर्ष मांडणारं आहे. वैशिष्ट्यपूर्ण लेखनाद्वारे वाचकांच्या मनावर अधिराज्य करणारे साहित्यिक द.मा.मिरासदार आणि व.पु.काळे यांची पुस्तकं निखळ वाचनानुभव देतात. तर, प्रसिद्ध लेखक व ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी आपल्या साहित्यकृतींमध्ये इतिहास आणि लालित्यपूर्ण लेखन यांचा उत्तम मेळ साधला आहे. महत्त्वपूर्ण ऐतिहासिक घटनांवरच्या सखोल संशोधनातून त्यांचं इतिहासविषयक लेखन साकारलं आहे. 'संभाजी', 'महासम्राट' कादंबरीमालिका यांसारख्या साहित्यकृती याचा प्रत्यय देतात. ज्येष्ठ इतिहास-संशोधक जयसिंगराव पवार यांचं आत्मचरित्र 'पंचगंगेच्या तीरावरून' हे त्यांच्या जीवनकहाणीबरोबरच त्यांच्या इतिहास संशोधनाचा प्रवासही उलगडतं.

यांबरोबरच, मेहता पब्लिशिंग हाऊसची अनुवादित पुस्तकंही वाचकांच्या मनाचा ठाव घेतात. प्रख्यात लेखक डॉ.एस.एल.भैरप्पा यांची डॉ.उमा कुलकर्णी यांनी अनुवादित केलेली पुस्तकं, तसंच लीना सोहोनी, सुप्रिया वकील, अपर्णा वेलणकर यांची अनुवादित पुस्तकं आणि इतरही अनुवादकांची अनुवादित पुस्तकं यांद्वारे वाचकांसमोर विचारांचं-वाचनाच्या स्तरावरचं वेगळं विश्व साकारतं. या आणि अशा अनेक साहित्यकृती आणि साहित्यिक वाचकांचं भावविश्व विविध प्रकारे समृद्ध करतात. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या सर्वच पुस्तकांचं हे वैशिष्ट्य होय.

किंबहुना, अनेक साहित्यिकांचंही मेहता पब्लिशिंग हाऊसशी असंच ऋणानुबंधाचं नातं पुस्तकांच्या निमित्ताने जुळलं आहे. विशेषतः, ज्येष्ठ

इतिहास-संशोधक जयसिंगराव पवार यांचा आमच्या संस्थेशी जुळलेला ऋणानुबंध हा शब्दातीत असाच आहे. सरांचं आणि प्रकाशनसंस्थेचं नातं हे केवळ ‘लेखक आणि प्रकाशक’ इतकंच सीमित नव्हतं; तर ते एका ‘कुटुंबा’सारखं नातं होतं. संस्थेच्या स्थापनेपासूनच ते ऋणानुबंध जुळले. सरांची अनेक पुस्तकं आमच्या प्रकाशनसंस्थेने प्रकाशित केली. मात्र, सरांच्या आणि आमच्या जिव्हाळ्याचा विषय असलेलं पुस्तक, म्हणजे, त्यांचं ‘पंचगंगेच्या तीरावरून’ हे आत्मचरित्र. सरांचा हा आयुष्यरूपी ठेवा वाचकांच्या हाती देताना कृतार्थतेची भावना मनात होती. या संपूर्ण लेखनप्रवासात सरांचं अतिशय मोलाचं मार्गदर्शन संस्थेतील सर्वांनाच लाभलं. शिवाय, त्यांचा खंबीर आधार सदैव होता. आदरणीय जयसिंगराव पवार सरांना नुकतीच देवाज्ञा झाली. त्यामुळे, ‘जागतिक पुस्तक दिन आणि पुस्तकं’ यांचा विचार करताना, ती उणीव प्रकर्षाने जाणवणारी आहे. पुस्तकविश्वाचं भरून न येणारं नुकसान झालं आहे. मात्र, त्यांचे आशीर्वाद सदैव आमच्या पाठीशी असतील, याचीही खात्री आहे. त्यांचं कार्य पुढे नेण्यासाठी त्यांचे आशीर्वाद आम्हाला नक्कीच प्रेरणा देत राहतील; ऊर्मी देत राहतील हासुद्धा विश्वास आहेच. तो अधिकाधिक दृढ करणं ही आपली जबाबदारी आहे.

या पार्श्वभूमीवर, ‘जागतिक पुस्तक दिना’च्या निमित्ताने सर्वांनी आपली वाचनाची आवड जोपासावी, पुस्तकांशी असलेली मैत्री वृद्धिंगत करावी. या क्षणी, प्रसिद्ध कवी रमण रणदिवे यांच्या काही ओळी आठवतात-

*‘दाद देण्याचे तुम्हाला भान आहे, आज शब्दांची कसोटी छान आहे*
*या जरा सांभाळुनी कंठी सुरांनो, वावगे बोलू नका हो अक्षरांनो*
*जाणकारांचा शहाणा कान आहे...’*

खरं पाहता, ही गझल प्रामुख्याने रसिक श्रोत्यांसाठी असेल, तरीही ती शहाणीव रसिक वाचकांच्या मनात निर्माण करून, त्याद्वारे जीवन समृद्ध करण्याचं महत्त्वपूर्ण योगदान पुस्तकं देतात. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, या सर्वांमधून प्रकाशकांशी असलेला बंध ती दृढ करतात. ‘जागतिक पुस्तक दिना’च्या निमित्ताने हा बंध आपण आणखी दृढ करू या.

अखिल मेहता

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी**
**आजच वर्गणीदार व्हा**

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

*Available on*

amazonkindle | Google Play Books

अधिक माहिती जाणून घेण्यासाठी
आम्हाला फॉलो करत रहा!

http://www.facebook.com/mehtapublishinghouse



टी बुक क्लब
मेहता पब्लिशिंग हाऊस
टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त
BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!
आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं
* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
'टी बुक क्लब' ची ग्रंथसूचि पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx





नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर
– थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!
॥ स्वामी ॥
रणजित देसाई
ebook available on :
Google Play Books
amazon kindle
Get it on Apple Books

# साहित्य वार्ता

**‘भैरप्पांच्या तोडीचा कादंबरीकार मराठीत अजून झाला नाही’- डॉ.उमा कुलकर्णी**

‘पद्मभूषण पुरस्कार’प्राप्त ज्येष्ठ कन्नड साहित्यिक डॉ.एस.एल.भैरप्पा यांना अभिवादन करण्यासाठी पुणे येथे ‘विशेष परिसंवाद’ आयोजित करण्यात आला होता. ‘विवेक व्यासपीठ’, ‘विवेक साहित्य मंच’ आणि ‘विदिशा विचार मंच’ यांच्या संयुक्त विद्यमाने १४ मार्च रोजी या परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं होतं. त्या वेळी ज्येष्ठ अनुवादिका डॉ.उमा वि. कुलकर्णी, डॉ.रूपाली शिंदे, श्रीधर लोणी व दिलीप करंबेळकर हे मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी, डॉ.अर्चना कुडतरकर यांनी डॉ.उमा कुलकर्णी यांच्याशी थेट संवाद साधला. तेव्हा, ‘भैरप्पांच्या तोडीचा कादंबरीकार मराठीत अजून झाला नाही’ असं मत त्यांनी व्यक्त केलं. तसंच, ‘त्यांच्या साहित्यात त्यांनी भारतीय मूल्यव्यवस्था व जातीय गुंतागुंत नेमकेपणाने मांडली’ असं प्रतिपादन करत, ‘भैरप्पा हे प्रतिक्रियावादी नसून, समाज डोळसपणे पाहणारे लेखक असल्याचं’ही डॉ.उमा कुलकर्णी यांनी नमूद केलं. या वेळी इतर मान्यवरांनीही डॉ.एस.एल.भैरप्पा यांच्या साहित्यिक योगदानाविषयी आपले विचार व्यक्त केले.



## ‘महाराष्ट्र साहित्य परिषदे’च्या निवडणुकीत ‘साहित्य संवर्धन’ पॅनलचा विजय

‘आद्य साहित्यसंस्था’ असा लौकिक असलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्या तब्बल दहा वर्षांनंतर झालेल्या निवडणुकीत योगेश सोमण यांच्या ‘साहित्य संवर्धन’ पॅनलचा विजय झाला आहे. या निकालामुळे महाराष्ट्र साहित्य परिषदेत मोठा सत्ताबदल घडून आला असून, अनेक वर्षांनंतर नवी कार्यकारिणी रुजू झाली आहे. पुढील वर्षी होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर हा बदल महत्त्वपूर्ण ठरला आहे. ‘साहित्य संवर्धन’ पॅनलचे योगेश सोमण (अध्यक्ष), स्वाती महाळंक (प्रमुख कार्यवाह), प्रदीप निफाडकर(कोषाध्यक्ष) असे प्रमुख उमेदवार निवडून आले आहेत. ‘साहित्य संवर्धन’ पॅनलने ‘उत्कर्ष परिवर्तन’ पॅनलचा पराभव केला आहे. ‘साहित्य संवर्धन’च्या विजयामुळे योगेश सोमण हे ‘साहित्य महामंडळाचे’ही अध्यक्ष असतील. तसंच, स्वाती महाळंक आणि प्रदीप निफाडकर हे साहित्य महामंडळाचे पदाधिकारी असतील.

## रश्मी बन्सल यांच्याशी संवाद

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रसिद्ध लेखिका व युवकांचं प्रेरणास्थान असलेल्या रश्मी बन्सल यांच्याशी थेट संवादाचं आयोजन करण्यात आलं होतं. अक्षय वाटवे यांनी रश्मी बन्सल यांच्याशी संवाद साधला. या संवादादरम्यान त्यांनी आपल्या लेखनाच्या श्रीगणेशापासून ते प्रसिद्धीपर्यंतचा प्रवास उलगडला.

रश्मी बन्सल यांची उद्योजकतेवर आणि प्रेरणादायी कथांवर आधारित पुस्तकं मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली आहेत. त्यांमध्ये, ‘आय हॅव अ ड्रीम’, ‘टेक मी होम’, ‘कनेक्ट द डॉट्स’, ‘अराईज अवेक’ यांसारख्या प्रसिद्ध पुस्तकांचा समावेश आहे. २८ मार्च रोजी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथदालनात हा कार्यक्रम पार पडला. या वेळी मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक अखिल मेहता उपस्थित होते.

# पुरस्कार

## चंद्रमोहन कुलकर्णी यांना 'गोदावरी गौरव पुरस्कार'

कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा प्रतिष्ठित असा 'गोदावरी गौरव पुरस्कार' ज्येष्ठ व प्रसिद्ध चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांना नाशिक येथे १० मार्च रोजी प्रदान करण्यात आला. मराठी, कला, विज्ञान, समाजसेवा अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'गोदावरी गौरव पुरस्कारा'ने सन्मानित केलं जातं.


प्रख्यात लेखक-समीक्षक वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते चंद्रमोहन कुलकर्णी यांचा चित्रकलेतील प्रदीर्घ सेवेबद्दल कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला. त्या वेळी पुरस्काराला उत्तर देताना, 'कलाशिक्षण हे तंत्रशिक्षणात रूपांतरित होऊ पाहतंय, तसंच चित्रकलेकडे आजही उदासीनतेनेच पाहिलं जातं' अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झालेल्या अनेकविध पुस्तकांसाठी चंद्रमोहन कुलकर्णी सरांनी अतिशय अर्थपूर्ण व चित्तवेधक मुखपृष्ठं केली आहेत.

◆

## नवी संहिता... नवा आशय...

# 'बाबासाहेब' घडताना




**आकाश सिंग राठौर**

अनुवाद

**उत्पल व. बा.**

बाबासाहेबांच्या उमेदीच्या वर्षांचा सखोल पट मांडणारं आणि
बाबासाहेबांच्या जीवनातील अज्ञात घटनांवर प्रकाश टाकणारं चरित्र

**किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# इंडिपेन्डन्स




**चित्रा बॅनर्जी दिवाकरूनी**

अनुवाद


**लीना सोहोनी**

स्वातंत्र्य लढ्याच्या पार्श्वभूमीवर घडणारी तीन बहिणींची हृदयस्पर्शी कहाणी

**किंमत : ५९०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# श्रद्धांजली

## ज्येष्ठ इतिहास-संशोधक जयसिंगराव पवार कालवश



ज्येष्ठ इतिहास-संशोधक जयसिंगराव पवार यांचं दिनांक २६ मार्च रोजी निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी इतिहासाचे अध्यापन केले. इतिहास-संशोधन क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्याचा अमीट ठसा उमटवला. विशेषतः छत्रपती संभाजी महाराज, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महाराणी ताराबाई, महापराक्रमी संताजी यांच्याविषयी त्यांनी मोलाचं संशोधन केलं. त्यांनी क्रमिक पुस्तकांसाठीही लेखन केलं आणि त्यांची क्रमिक पुस्तकं विद्यार्थिप्रिय ठरली. त्यांच्या 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथा'चा सोळा भाषांमध्ये अनुवाद झाला आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे त्यांची पंचवीस पुस्तकं प्रकाशित करण्यात आली असून, त्यांपैकी 'पंचगंगेच्या तीरावरून' हे त्यांचं आत्मचरित्र नुकतंच प्रकाशित करण्यात आलं आहे. भाई वैद्य स्मृती गौरव पुरस्कार, भारती विद्यापीठातर्फे जीवनसाधना गौरव पुरस्कार, यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार, सह्याद्री प्रतिष्ठानचा शिवराज्यभूषण पुरस्कार या पुरस्कारांनी ते सन्मानित होते. तसेच इतिहास-संशोधन क्षेत्रातील त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला होता. त्यांच्या निधनाने इतिहास-संशोधन क्षेत्रातील व्यासंगी व्यक्तिमत्त्व हरपलं. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या संपूर्ण परिवारातर्फे जयसिंगराव पवार सरांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# ‘रेमंड मॅन’ विजयपत सिंघानिया यांचे निधन



देशातील प्रसिद्ध उद्योगपती, ‘रेमंड’ ग्रूपचे माजी अध्यक्ष व पद्‌मभूषण पुरस्कार-विजेते विजयपत सिंघानिया यांचं २८ मार्च रोजी निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. उद्योग, विमानचालन आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिलं आहे. विशेषतः, त्यांनी ‘रेमंड’ या वस्त्र-ब्रॅन्डला देश-विदेशांत ओळख मिळवून दिली. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे त्यांच्या ‘ॲन इनकम्प्लीट लाइफ’ या आत्मचरित्राचा मराठी अनुवाद प्रकाशित करण्यात आला आहे. त्यांच्या वादळी आयुष्याचा लेखाजोखा मांडणारं हे पुस्तक आहे. सिंघानिया यांच्या निधनाने उद्योगक्षेत्रातील एक युग संपल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या संपूर्ण परिवाराच्या वतीने विजयपत सिंघानिया यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

◆

## विशेष लेख

# थोर इतिहास-संशोधक हरपला

डॉ.जयसिंगराव पवार सरांची ओळख झाली, ते साल होतं २००२. इयत्ता पाचवीमध्ये नुकताच हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला होता. त्या वेळेस 'राजर्षी शाहू आरक्षण शताब्दी (१९०२ ते २००२)' निमित्ताने बसपाचे संस्थापक कांशीराम आणि उत्तर प्रदेशच्या तत्कालीन मुख्यमंत्री मायावती हे कोल्हापूरमध्ये आले होते. नव्या राजवाड्यावर डॉ.जयसिंगराव पवार यांनी या दोन्ही प्रमुख पाहुण्यांना 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ' भेट देऊन सन्मानित केल्याच्या बातम्या दैनिकात वाचल्याचं आजही चांगलं आठवतं.

त्यानंतर पुण्यातील, 'शिवपुत्र राजाराम' या पुस्तक प्रकाशनाच्या समारंभास २०१८ साली गेलो होतो. पुण्यात जर एखादा कार्यक्रम असेल, तर त्याला आवर्जून हजेरी लावायची, हा शिरस्ताच होऊन गेला होता. तो ४ जानेवारी, २०२६पर्यंत सुरू होता. 'भारत इतिहास संशोधक मंडळा'ने डॉ.पवार सरांना 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित केलं होतं. त्या कार्यक्रमाला मी हजेरी लावली होती. कार्यक्रमानंतर डॉ.पवार सरांची भेट घेऊन त्यांच्या

पुस्तकांवर स्वाक्षऱ्या घेतल्या होत्या.

डॉ.जयसिंगराव पवार महाराष्ट्रातील एक ख्यातनाम इतिहास-संशोधक. पवार सरांनी इतिहासात पदव्युत्तर पदवी मिळवल्यावर इतिहास संशोधनाच्या कार्यास सुरुवात केली. शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाल्यावर लगेचच पवार सर इतिहास विभागात रुजू झाले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ.अप्पासाहेब पवार हे त्यांचे गुरू. वयाच्या २०व्या वर्षापासून सुरू असलेलं संशोधनाचं काम अव्याहतपणे सुरू होतं. 'मराठेशाहीचा इतिहास' हा सरांच्या अभ्यासाचा आणि संशोधनाचा विषय. मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई, छत्रपती राजाराम महाराज, सरसेनापती संताजी घोरपडे यांची संशोधनात्मक चरित्रं त्यांनी लिहिली. या इतिहासकालीन अलक्षित व्यक्तींची ओळख चरित्ररूपाने लोकांना करून दिली. आजवर सरांचे ७०हून अधिक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासातील त्यांचं महत्त्वाचं योगदान म्हणजेच, 'राजर्षी शाहू पंचखंडात्मक' स्मारक ग्रंथाचं संपादन होय. त्याचसोबत, त्यांनी लिहिलेलं 'शाहूचरित्र' मराठी भाषेशिवाय कानडी, कोंकणी, तेलगू, उर्दू, हिंदी, सिंधी, गुजराती, बंगाली, इंग्रजी, जर्मन, रशियन, इटालियन इत्यादी भाषांत प्रकाशित झालं आहे. राजर्षी शाहू महाराजांसारखा द्रष्टा लोकराजा असलेल्या महापुरुषाचं चरित्र राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचं महत्त्वाचं कार्य डॉ.जयसिंगराव पवार यांनी केलं आहे.

मे २०२२मध्ये, मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकनिर्मिती विभागात रुजू झाल्यावर डॉ.पवार सरांसोबत कामानिमित्ताने वारंवार संपर्क होऊ लागला. २०२२मधील सप्टेंबर महिन्यात पवार सरांची पाच पुस्तकं मेहता पब्लिशिंग हाऊसने एकत्रित प्रकाशित केली. डॉ.पवार सरांच्या पुस्तकांवर प्रत्यक्ष काम करण्याची संधी पहिल्यांदा मिळाली. त्यानंतर ज्या-ज्या वेळी कोल्हापूरला जाण्याचा योग आला, त्या प्रत्येक वेळेस सरांची भेट घेणं, त्यांच्यासोबत संवाद साधणं हा पायंडाच होऊन गेला होता. सरांच्या पुस्तकाची नवीन आवृत्ती आल्यावर त्या पुस्तकाच्या भेटप्रती पाठवल्या म्हणून सरांना फोन करणं, शक्य असल्यास कोल्हापूर

भेटीदरम्यान भेटप्रती त्यांच्या घरी नेऊन देणं अशा काही ना काही कारणाने त्यांच्याशी संवाद सुरू असायचा.

मेहता पब्लिशिंग हाऊस आणि डॉ.जयसिंगराव पवार यांच्यातील ऋणानुबंध संस्थेच्या स्थापनेपासूनचा. पुढे हे नातं लेखक-प्रकाशक यापुरतं मर्यादित न राहता, मेहता पब्लिशिंग हाऊसच्या परिवारातील एक ज्येष्ठ सदस्य आणि कायमच पाठीशी उभे राहणारे म्हणून दृढ होत गेलं. सरांच्या पुस्तकांची कामं करत असताना सरांचं मिळणारं मार्गदर्शन, त्यांच्या कामाची पद्धत यांचा कायमच अनुभव घेता आला.

२०२४ साली सरांच्या दोन पुस्तकांची कामं सुरू होती. मराठ्यांच्या इतिहासावरील महत्त्वाची अशी ती दोन पुस्तकं - 'मराठ्यांचा इतिहास खंड १ : शिवशाही' आणि 'मराठ्यांचा इतिहास खंड २ : पेशवाई' ही पुस्तकं अनुक्रमे डिसेंबर २०२४ व जानेवारी २०२५मध्ये प्रकाशित झाली. मराठेशाहीच्या साद्यंत इतिहासाचा वेध घेणारी व उच्च संदर्भमूल्य असणारी महत्त्वपूर्ण अशी ही दोन पुस्तकं.

डॉ.जयसिंगराव पवार म्हणजे इतिहास-संशोधन क्षेत्रातील महत्त्वपूर्ण नाव. 'तरुण पिढीसाठी आश्वासक असे संशोधक' म्हणून डॉ.पवार यांचा लौकिक होता. सरांच्या मनातील जिव्हाळ्याचा आणि हळवा विषय म्हणजे, 'पंचगंगेच्या तीरावरून' हे त्यांचं आत्मचरित्र. ते काम सुरू असताना सरांबरोबर वरचेवर संवाद साधावा लागत असे. 'पुस्तक कधी प्रकाशित करताय?' अशी प्रेमळ विचारणा ते कायम आम्हाला करत असत. या आत्मचरित्राचं काम सुरू असताना सरांनी आम्हाला वेळोवेळी मार्गदर्शन केलं. माझ्यासारख्या तरुण पिढीतील व्यक्तीसोबत जुळवून घेण्याची हातोटी विलक्षण स्वरूपाची म्हणावी लागेल. अत्यंत सहजसुलभ आणि संयतपणे सरांचं मार्गदर्शन त्या वेळेस आम्हाला मिळालं.

'पंचगंगेच्या तीरावरून' हे आत्मचरित्र जानेवारी २०२६मध्ये प्रसिद्ध झालं. त्या पुस्तकाच्या भेटप्रती आमचे व्यवस्थापकीय संचालक अखिल मेहता यांनी डॉ.पवार सरांच्या घरी जाऊन समक्ष भेटीत दिल्या होत्या. पुस्तकांच्या प्रती पाहून खूश झालेले सर आणि त्यांनी आम्हा सर्व




सहकाऱ्यांना दिलेली कौतुकाची थाप हे अगदी आत्ताच घडून गेलं आहे, असं वाटतं. त्या वेळेस सरांनी फोनवरून आमच्याशी संपर्क साधला होता. दुर्दैवाने, सरांचं हे अखेरचं पुस्तक ठरावं याबाबत आजही विश्वास बसत नाही.

२६ मार्च, २०२६ हा दिवस उजाडला, तो सरांच्या निधनाच्या बातमीने. सारंकाही क्षणासाठी थांबल्यासारखं झालं. सरांच्या अनेक आठवणी मनात दाटून आल्या. सर आपल्यात नाहीत, ही गोष्टच मनाला पटत नव्हती. मात्र, जे आहे ते मान्य करावंच लागतं. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा ध्यास आणि वसा असलेल्या या इतिहास-संशोधकाने आपला अखेरचा श्वास पंचगंगेच्या तीरावर कोल्हापूर येथे घेतला. सरांच्या जाण्याने व्यक्तिगतरीत्या माझं आणि मेहता पब्लिशिंग हाऊसचं भरून न येणारं नुकसान झालं आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील संशोधकीय क्षेत्रातही पोकळी निर्माण झाली आहे. डॉ.जयसिंगराव पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**- प्रतीक सुनील येतावडेकर**

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# द हिडन हिंदू

**अक्षत गुप्ता**

अनुवाद

**मुक्ता देशपांडे**

पृष्ठे : २४४
किंमत : २८०

*देशभरातील वाचकांवर मोहिनी घालणाऱ्या, अल्पावधीत बेस्ट सेलर ठरलेल्या 'द हिडन हिंदू' मालिकेचा दुसरा भाग आता मराठीत*

### विलुप्त झालेल्यांचा प्रदेश

रॉस आयलन्डवर घडलेल्या घटना पृथ्वी बऱ्याच वेळापासून सांगत होता. मृत संजीवनीच्या पुस्तकांविषयी ओमची चाललेली चौकशी, ओमच्या भूतकाळाचा उलगडा, अश्वत्थामा आणि परशुराम यांचं पुन्हा अवतरणं, नागेंद्राबरोबर असलेलं त्यांचं शत्रुत्व आणि नागेंद्राचे डावे-उजवे हात असलेल्या परिमल आणि LCD

यांचं खरं स्वरूप उघडकीस येणं (जे भारतीय इतिहासाचा एक प्राध्यापक आणि एक हॅकर म्हणून वावरत होते), या सगळ्यामुळे मिसेस बत्रांचं डोकं आधीच गरगरायला लागलं होतं. ही सगळी माहिती समजून घेण्याची धडपड करत असतानाच पृथ्वीनं सांगितलेल्या नव्या गुपितामुळे उत्तरं मिळायच्या ऐवजी प्रश्नच उभे राहिले. तो ओमचा मुलगा असल्याचा दावा ऐकल्यानंतर दचकलेल्या मिसेस बत्रा एकदम ताठ बसल्या आणि म्हणाल्या, ''ओम शास्त्री तुझे वडील आहेत?''

''बरं, मला जरा विश्रांती हवीये,'' गोंधळलेल्या स्वरात त्या पुढे म्हणाल्या. ''तुला काही हवंय का? मी पट्कन जरा सूप गरम करून आणते.''

''अरे वा! चालेल मला, धन्यवाद,'' म्हणत पृथ्वी हसला.

मिसेस बत्रा स्वयंपाकघरात गेलेल्या असताना पृथ्वी सभोवतालचं निरीक्षण करायला लागला. त्यांचं घर लक्षणीयरीत्या आटोपशीर होतं. दिवाणखान्यातलं फर्निचर साधंसुधं होतं, काचेच्या खिडक्यांमधून बाहेर एक छोटी बाग आणि व्हरांडा दिसत होते. दोन दारं शयनगृहांकडे जात होती आणि आणखी एक दार खाली जाणाऱ्या जिन्याच्या तोंडाशी होतं. पृथ्वी बसला होता त्याच्या मागे एक भिंत मि. बत्रांना त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातल्या कामगिरीबद्दल मिळालेली सन्मानचिन्हं मिरवत होती. फ्रेम केलेल्या फोटोवरून असं दिसत होतं की, त्या दाम्पत्याला मूलबाळ नसावं, एकमेकांकरता फक्त ती दोघंच होती. दोन हातात सूपचे दोन बाउल्स आणि मनात प्रश्न घेऊन मिसेस बत्रांनी दिवाणखान्यात प्रवेश केला तसं पृथ्वीचं निरीक्षण थांबलं.

''रॉस आयलन्डवर हे नाट्य घडत असताना तू कुठे होतास?'' त्यांनी विचारलं. चमच्यातलं सूप फुंकून एक घोट घेत असताना पृथ्वीनं क्षणभर विचार केला आणि तो म्हणाला, ''ते जरा गुंतागुंतीचं आहे. मी एकाच वेळी समुद्रसपाटीपासून २१, ७८० फूट उंचीवर आणि २५,९३८ फूट खाली होतो. तुम्हाला आधी कुठे जायला आवडेल - पर्वतांवर की समुद्राच्या आत?''

या कोड्यावर जरा तोंड वाकडं करत मिसेस बत्रा म्हणाल्या, ''वरपासूनच सुरू करू या.''

समुद्रसपाटीपासून २१,७८० फूट उंचीवर एका अनोळखी ठिकाणी ओम बेशुद्धावस्थेत पडला होता. त्याच्या जाणिवा हळूहळू जागृत होत असतानाच त्यानं लांबवरून आलेली एक आरोळी ऐकली.

''त्वरा करा! त्याला ताबडतोब यायला सांगा.''

भूतकाळातल्या एखाद्या स्वप्नातून जागं होत असल्यासारखे ओमनं सावकाश आपले डोळे उघडले. त्याच्याभोवती रिंगण करून काही वृद्ध माणसं उभी होती, ती त्याच्याकडे आनंदानं हसत पाहत होती, त्यातल्या कुणालाच तो ओळखत नव्हता, तरीही (आश्चर्य म्हणजे) त्यांच्या नजरेखाली त्याला सुरक्षित वाटत होतं. तो कसाबसा उठला आणि त्याच्या अंगाखाली अंथरलेल्या पातळ तागाच्या चटईवर ताठ होऊन उठून बसला. चिखल-मातीनं लिंपलेल्या भिंती असलेली ती झोपडी कमालीची थंड होती. त्याच्याभोवती उभ्या असलेल्या माणसांच्या अंगावर करड्या रंगाचे लोकरी अंगरखे होते. प्रत्येकाचे कपडे एकसारखे होते आणि ओमला दिसलं की त्याच्याही अंगावर तेच कपडे होते. हा एखादा मठ असावा, त्यानं अंदाज बांधला.

त्यानं सभोवती बघितलं तेव्हा एका कोपऱ्यात उभ्या केलेल्या आरशात त्याचं प्रतिबिंब त्याला दिसलं. त्याच्या डोक्यावर नेहमी असणाऱ्या भयानक जटा त्याला दिसल्या नाहीत किंवा चेहऱ्यावरच्या अस्ताव्यस्त वाढलेल्या, फिस्कारलेल्या दाढी-मिशाही दिसल्या नाहीत. त्याऐवजी त्याला त्याचे व्यवस्थित कापलेले केस दिसले आणि गुळगुळीत दाढी केलेला चेहरा दिसला, ज्यामुळे त्याच्या चेहरेपट्टीकडे लक्ष वेधलं जात होतं : दाढी नसलेले गाल आणि ओठांची ठेवण, कपाळ, डोळे - त्याचं दिसणं पूर्णपणे बदलून गेलं होतं.

लाकडी जाळी असलेल्या छोट्या खिडकीतून ओमनं बाहेर पाहिलं आणि त्याला अगदी छोटे-छोटे हिमकण खाली हळुवारपणे पडताना आणि नजर पोचेल तिथपर्यंत जमिनीवर पसरलेल्या पांढऱ्याशुभ्र दुलईत ते लुप्त होताना दिसले. अचानक, हे दृश्य याआधी बघितलं असल्याची भावना त्याच्या मनात जागी झाली. झोपडीत जागं होणं, अनोळखी चेहरे आजूबाजूला दिसणं, बाहेर चाललेला हिमवर्षाव – हे सगळं त्याला, तो पहिल्यांदा धन्वंतरी आणि सुश्रुतना भेटला होता त्या क्षणाची आठवण करून देत होतं... ओमची पहिली आठवण. ते सगळं घडून जरी युगं लोटली असली, तरी एक गोष्ट मात्र बदललेली नव्हती-'मृत्युंजय' होण्यापूर्वी तो कोण होता, याची अजूनही त्याला काडीमात्रही कल्पना नव्हती.

अंगावरचं पांघरूण दूर सारून तो उभा राहिला आणि दाराकडे जाता-जाता त्याच्या भोवती उभ्या असलेल्या त्या वृद्धांना त्यानं प्रश्न केला, ''मी

कुठे आहे? माझ्यासाठी ज्याला बोलवलं गेलं आहे, तो कोण आहे?'' त्या अनोळखी लोकांना प्रश्न विचारत असतानाच ते कोण असावेत याबाबत तो विचार करत होता; पण त्याबद्दल काही अंदाज बांधण्यापूर्वीच त्याच्या विचारांना एका बुलंद, घुमावदार आवाजानं खीळ बसली, तो आवाज अलीकडेच त्याच्या परिचयाचा झाला होता.

'त्यांनी मला बोलावलंय,' सगळ्या युगांमधल्या बलाढ्य योद्ध्यांपैकी एक असलेल्या योद्ध्याच्या आवाजात उत्तर आलं. पाठोपाठ तो शापित चिरंजीव अश्वत्थामा प्रकटला. रॉस आयलन्डवर शुद्ध हरपण्यापूर्वी ओम त्याला भेटला होता, तिथे अश्वत्थामा आधुनिक योद्ध्याला साजेशा पेहरावात होता. इथे मात्र तो ओम आणि इतर सर्वांनी परिधान केलेल्या अंगरख्यासारख्याच कपड्यांत होता. इथे कोणताही फरक नव्हता; प्रत्येक जण एकसमान होता आणि एक प्रकारची प्रगाढ शांतता आणि परस्परांविषयीचा आदर न बोलताही जाणवत होता. अश्वत्थामा चालत गेला तशी त्या सगळ्या वृद्धांची मस्तकं आदरानं झुकली. त्यानंही त्यांना तशाच प्रकारे अभिवादन केलं. ओमला गोळीनं झालेली जखम बघायला तो जवळ आला; पण जखम नाहीशी झाली होती. कोणताही व्रण मागे न ठेवता जखम चमत्कार व्हावा तशी दिसेनाशी झाली होती. असं काही घडेल याची अश्वत्थाम्याला अपेक्षाच असावी, त्यानं ओमच्या चेहऱ्याकडे पाहिलं; पण ओमच्या मनात बरेच प्रश्न तयार होते.

''ही जागा ओळखीची वाटते... मी कुठे आहे?''

अश्वत्थामा हसला. ''हो, तू याआधी इथे होतास. तू पुन्हा जागा झालास त्यानंतर 'मृत संजीवनी'चा रक्षणकर्ता म्हणून जवळजवळ नऊ वर्षं हिमालयात भटकत होतास. धन्वंतरी आणि सुश्रुत यांचं निवासस्थान, जे तुझ्या पुनरुत्थानाचं ठिकाण होतं, त्याच्या म्हणजेच तुझ्या पहिल्या घराच्या जवळ ही जागा आहे.''

अश्वत्थाम्याने हे शब्द उच्चारताच ओम मुळापासून हलला. आत खोलवर कुठेतरी याच उत्तरासाठी तो आतुर झाला होता; पण तरीही ते ऐकण्यासाठी त्याच्या मनाची तयारी अजून झाली नव्हती. अखेरीस, जी जागा त्याला कायम हुलकावणी देत आली होती ती सापडली होती, त्याचा शतकानुशतकांचा शोध थांबला होता. त्याच्या मनात हजारो प्रश्न उसळी घेत होते आणि काय प्रतिक्रिया द्यावी हे त्याला कळत नव्हतं. ओमनं कसंतरी स्वत:ला सावरलं

आणि शेवटी तो म्हणाला,

''अच्छा, म्हणजे आपण हिमालयाच्या पर्वतरांगांमध्ये आहोत! मला ही जागा कधीच सापडली नाही. हा कोणता पर्वत आहे?''

अश्वत्थाम्यानं एका काव्यपंक्तीद्वारे उत्तर दिलं.

'परम रम्य गिरिवर कैलासू।
सदा जहाँ शिव-उमा निवासू ।।'

आपण उभे आहोत त्या पवित्र पर्वताशी संबंधित या अवधी भाषेतल्या ओळी आहेत हे ओमला समजलं. त्यानं हात जोडले, स्तिमित होऊन वर बघितलं आणि म्हणाला, ''कैलास पर्वत! प्रभू शिवशंकराचं निवासस्थान, या ब्रह्मांडाचं केंद्रस्थान, या परिमंडलाचं नाभीस्थान, जगाचा आधारस्तंभ, स्वस्तिक पर्वत, तिबेटी भाषेत 'हिमाचं अमूल्य नक्षत्र' ही सगळी नावं आहेत जगातल्या सर्वांत पवित्र आणि गूढ पर्वतांपैकी एक असलेल्या कैलास पर्वताची!''

''हो, कैलास पर्वत,'' अश्वत्थाम्यानं मान डोलावली.

आणखी स्पष्ट माहिती कळण्याच्या अपेक्षेनं ओमनं पुन्हा प्रश्न विचारला, ''मी याआधीही कैलासावर येऊन गेलो आहे; पण मला माझं घर कधीच सापडलं नाही.''

''मला माहीत आहे,'' अश्वत्थामा आत्मविश्वासानं उत्तरला. या उत्तरामुळे ओमनं पुढचा प्रश्न केला, ''का नसेल सापडलं?''

''आतापर्यंत, पवित्र कैलास पर्वत चढून जाण्यात कुणालाही यश आलं नाहीये आणि पुढेही कधी येणार नाही. त्याचं शिखर गाठण्याच्या प्रयत्नात  अनेक मोहिमा अपयशी ठरल्या आहेत. तो चढून जाण्याची मनीषा बाळगणाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या वाटांची दिशा हा पर्वत रहस्यमयरीत्या बदलून टाकतो. त्याला या पृथ्वीचा आस मानलं जातं; पृथ्वी, स्वर्ग आणि पाताळ यांना जोडणारा समन्वयबिंदू मानलं जातं, भौतिक आणि आध्यात्मिक जगांना जोडणारा दुवा मानलं जातं–''

ओम मध्येच बोलला, ''हो, मला माहीत आहे की या भव्य-दिव्य पर्वतावर असलेलं प्रभू शंकर आणि देवी पार्वती यांचं निवासस्थान हे हजारो वर्षांपासून यात्रेकरूंच्या आकर्षणाचं केंद्र राहिलं आहे. जिथे स्वर्ग आणि पृथ्वी एकमेकांना  छेदतात असा हा अवकाशीय मध्यबिंदू आहे आणि हिंदू, बौद्ध

आणि जैन यांचं हे श्रद्धास्थान आहे. या चित्तवेधक पर्वतरांगांमध्ये ५०० आत्म्यांचा वास आहे, असा काही संतांचा विश्वास आहे आणि जेव्हा इथे राहणाऱ्या एखाद्या आत्म्याला मोक्ष हवा असतो, तेव्हाच दुसरा एखादा आत्मा इथे राहू शकतो.''

''हो, आणि त्या पवित्र आत्म्यांपैकी काही आत्मे आत्ता या क्षणी तुझ्यासोबत उभे आहेत,'' ओमला जी केवळ दंतकथा वाटत होती ती प्रत्यक्षात खरी असल्याचं अश्वत्थामा सांगत होता. त्या साधूंच्या घोळक्याचं ओमनं टक लावून निरीक्षण केलं आणि त्यांच्या चेहऱ्यावरचं शांत हसू त्याला दिसलं.

''या सर्वदूर पसरलेल्या दंतकथा खरंतर अगदी खऱ्या आहेत. ही जागा आहे 'ग्यानगंज', 'लुप्त झालेल्यांचं शहर,''' अश्वत्थाम्यानं पुन्हा ग्वाही दिली. ओमचे विचार जलदगतीनं पळत होते. शांत राहणं त्याच्यासाठी अशक्य झालं होतं आणि त्यानं पुन्हा एकदा अश्वत्थाम्याचं बोलणं तोडलं.

''दिव्य अमर आत्म्यांचं राज्य म्हणून हे अलौकिक इतिहासपूर्वकालीन भारतीय आणि तिबेटी शहर 'ग्यानगंज' पूजलं जातं, जगापासून पूर्णतः गुप्त राखलेलं. हिमालयाच्या खोल घळ्यांमध्ये वसलेलं असूनही त्याचा मानवजातीवर अनेक गुप्त मार्गांनी प्रभाव पडत आला आहे. ही ती जागा आहे, जिथे साधु-संत फक्त मानवजातीच्याच नव्हे; तर सगळ्या सजीवांच्या उत्क्रांतीची योजनाबद्ध जडणघडण करतात.''


''या जागेला बऱ्याचदा वेगवेगळ्या नावांनी संबोधलं जातं, जसं शांग्रीला आणि सिद्धाश्रम. सगळ्यांच्या नियतीची आखणी या पवित्र ठिकाणी केली जाते. कोणतंतरी पूर्वजन्मीचं नातं, अथवा काही कर्मसंबंध असल्याशिवाय कोणीही ग्यानगंजला पोचू शकत नाही,'' अश्वत्थामा पुढे म्हणाला.

ओमच्या मनातल्या शंका अजून संपल्या नव्हत्या; त्याच्या मनात अनुत्तरित प्रश्नांनी नुसती गर्दी केली होती. ''इथे मृत्यू होत नाही आणि जाणीव नेहमी जागृत राहते, हे खरं आहे का?''

ओम ज्या शब्दांची संपूर्ण आयुष्यभर वाट पाहत होता, तेच नेमके शब्द अश्वत्थाम्यानं उच्चारले, ''मी म्हणालो तसं, या जागेविषयी तू ज्या काही दंतकथा ऐकल्या असशील त्या सगळ्या खऱ्या आहेत. ओम, तू ज्या सोयऱ्यांच्या शोधात होतास तिथे तू अखेरीस येऊन पोचला आहेस.''

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## थर्ड मॅन

**डॉ. संजय ढोले**

पृष्ठे : १४८
किंमत : २४०

*भविष्यवेधी विज्ञानाची आस, हाच समाजाच्या, राष्ट्राच्या व देशाच्या प्रगतीचा इतिहास*

### उपरा

सहा, पाच, चार, तीन, दोन, एक, शून्य आकडे दिसताच अग्निबाणाच्या पायथ्याशी प्रचंड मोठा स्फोट होऊन यानानं अवकाशात झेप घेतली. यान हळूहळू वर जाऊ लागलं. रशियनतंत्रज्ञ साकोराव्हनी यानाची सूत्रं हाती घेतली, तर मूळची भारतीय पण आता अमेरिकेत स्थायिक झालेली अंतराळवीर लक्ष्मी रॉड्रिक्स, श्रीहरीकोटा येथील नियंत्रणकक्षेशी सातत्यानं संपर्कात होती. भारतीय शास्त्रज्ञ

डॉ. मिलिंद गाजवे कॉम्प्युटरवर डेटा फीड करण्यात मग्न होते.

यानानं हळूहळू पृथ्वीच्या वातावरणातील एक-एक टप्पा पार करत वेग घेतला. अजून एक छोटासा स्फोट होऊन यान पृथ्वीच्या कक्षेबाहेर पडलं.

श्रीहरीकोट्यातील नियंत्रणकक्षात शास्त्रज्ञांची उत्सुकता ताणली गेली. कॉम्प्युटर पडद्यावरील यानाचा बिंदू सावकाश सरकताना पाहून सर्वच शास्त्रज्ञ हर्षोल्हसित झाले होते. प्रत्येकाचीच धावपळ सुरू होती. कारण भारतानं स्वतंत्रपणे आखलेली ही पहिलीच 'अवकाशमोहीम' होती. ती यशस्वी करण्यासाठी भारतातील प्रत्येक शास्त्रज्ञ झटत होता.

साधारण दोन वर्षांपूर्वी भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे अध्यक्ष डॉ. कृष्णन् यांनी अवकाशात मानवसदृश मोहीम राबवण्याची घोषणा केली होती. पुढे मुख्यशास्त्रज्ञांचा गट स्थापन करून, भारत सरकारला मंजुरीसाठी प्रकल्प सादर करण्यात आला होता. या मोहिमेचा हेतूच मुळी पन्नास हजार किलोमीटर कक्षेत असणाऱ्या रशियन अवकाश बसस्थानकावर जाऊन, विविध प्रयोग करण्याचा असल्याने, त्यावर शास्त्रज्ञांची चर्चा, प्रतिचर्चा झाली. विरोधही झाला... अजूनही काही 'मानवरहित मोहिमा' राबवून अनुभव घ्यावा आणि मगच मानवाला पाठवावं, असंही सूचित करण्यात आलं... पण अवकाश संशोधन क्षेत्रातील भारताचा अनुभव पाहता, भारत सरकारने ही मोहीम राबवण्यासाठी मंजुरी देऊन, शास्त्रज्ञांवर एक प्रकारे विश्वास दाखवून मनोबलही वाढवलं होतं.

शास्त्रज्ञ उत्साहानं कामाला लागले होते. शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, अभियंते यांनी अग्निबाण व यानाच्या बांधणीला सुरुवात केली होती. या काही वर्षांत भारत अवकाश संशोधनात ठळकपणे जगाच्या नकाशावर आला होता. मानवरहित चंद्र व मंगळ मोहीम भारतानं या आधीच पूर्ण केली होती. त्यामुळे ही मोहीमही संपूर्णपणे भारतीय बनावटीचीच असावी, असा संशोधकांचा अट्टाहास होता. म्हणून प्रत्येक जण आपापली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत होता.

पुढे या स्वतंत्र भारतीय अवकाशमोहिमेत अमेरिका व रशियानंही सहभागी होण्याची रुची दाखवली होती. त्यामुळे शास्त्रज्ञांचा आत्मविश्वास दुणावला होता; शिवाय एक प्रकारे हा भारतीय अवकाश संशोधनावरील जागतिक पातळीवरील शास्त्रज्ञांनी दाखवलेला विश्वासही होता.

अमेरिकेनं या मोहिमेसाठी अवकाशप्रवास व मोहिमांचा बराच अनुभव

असलेल्या बेचाळीस वर्षीय अंतराळवीर लक्ष्मी रॉड्रिक्स यांची निवड केली होती. लक्ष्मी या मूळ भारतीय होत्या; पण अवकाश आणि एरोनॅटिक अभियांत्रिकीची पदवी प्राप्त केल्यानंतर, त्या 'नासा' या अमेरिकेच्या नामवंत संस्थेत अभियंता म्हणून दाखल झाल्या होत्या. तेथेच पिटर रॉड्रिक्स या तरुणाशी ओळख होऊन, प्रेमात रूपांतर झालं आणि त्याची परिणती पुढे लग्नात झाली. लक्ष्मी या हुशार व धाडसी होत्या. बऱ्याच अवकाश मोहिमांमध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. पुढे त्या अमेरिकेतच स्थायिक झाल्या होत्या. ठरावीक हेतूनं व प्रयोगासाठी या मोहिमेत अमेरिकेनं त्यांना सहभागी केलं होतं. 'साकोराव्ह' हा पस्तिशीतील तरुण होता. तंत्रज्ञ, अभियंता व कुशल वैमानिक होता... साधारण एक लाख तासांच्या विमानप्रवासाचा त्याला अनुभव होता. त्याला यानातील खडान्खडा माहिती होती. भारतीय अवकाशयानाचं खऱ्या अर्थानं तोच सारथ्य करणार होता.

तिसरे जे अंतराळवीर होते, ते म्हणजे मिलिंद गाजवे. चाळिशीतील तरुण. मूळ सैद्धान्तिक भौतिकशास्त्रापासून सुरू केलेला प्रवास, पुढे विज्ञानाचा प्रवाह पाहिल्यानंतर, प्रायोगिकतेकडे झुकलेले शास्त्रज्ञ... याशिवाय आंतरप्रणाली अंतर्गत त्यांनी जैव, रसायन, अवकाश, वातावरण यांसारख्या शास्त्रांचाही सखोल अभ्यास केला होता. खऱ्या अर्थानं ते बहुरंगी व बहुढंगी व्यक्तिमत्त्व होतं. डॉ. मिलिंद मुळातच हुशार होते. लहानपण अतिशय हलाखीत गेल्यानं, मागासवर्गीयांसाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीवरच ते पुढे शिकत राहिले. विज्ञानातील वेगवेगळ्या शाखांमधील त्यांचं ज्ञान व योगदान पाहता, त्यांची निवड स्वागतार्हच होती; पण तरी या मोहिमेसाठी निवड होताच, काही तथाकथित शास्त्रज्ञांनी त्यास विरोध केला होता. पण सरकारदरबारी, त्यांचं भौतिकशास्त्रातील एकूणच योगदान पाहता त्यांची निवड निश्चित केली होती.

पुढे एक वर्ष ते 'नासा'मध्ये अवकाश प्रशिक्षणासाठी होते. शारीरिक व मानसिक या दोन्ही पातळ्यांवर डॉ. मिलिंद फिट बसले होते. बहुजन समाजातून येणारा तरुण आज अवकाश मोहिमेवर निघाला होता, म्हणून एकूणच समाजाच्या सर्व स्तरांवर उत्साही वातावरण होतं.

...यानानं स्ट्रॅस्टोस्फिअर, ट्रोपोस्फिअर, एक्झोस्फिअर, आयनोस्फिअर सारख्या वातावरणातील थरांना ओलांडून, पंधरा व पस्तीस हजार कि.मी. अंतरावरील किरणांचा व्हॅन ॲलन पट्टाही ओलांडला होता... आणि

त्याचा प्रवास पन्नास हजार कि.मी. अंतरावर असलेल्या रशियन महाकाय अवकाशस्थानकाकडे होऊ लागला.

तीन दिवसांनंतर यान अवकाशस्थानकाला यशस्वीपणे जोडलं गेल्यानंतर, श्रीहरीकोट्यातील नियंत्रणकक्षात टाळ्यांच्या कडकडाटात एकच जल्लोष करण्यात आला. भारतीय स्वतंत्र बनावटीचं यान अवकाशस्थानकावर विविध प्रयोगांसाठी जोडलं गेलं होतं. लक्ष्मी, डॉ. मिलिंद व साकोराव्ह पुढील तीन महिने या स्थानकावर वास्तव्यास राहणार होते.

प्रथम अवकाशस्थानकात जाताच, डॉ. मिलिंद, लक्ष्मी आणि साकोराव्ह यांनी आपापल्या कक्षात जाऊन आराम केला.

साकोराव्हनं अवकाशस्थानकात फिरून, सर्व यंत्रणांची तपासणी करून घेतली. साकोराव्हला या स्थानकाविषयी बऱ्यापैकी माहिती होती. यापूर्वी तो एकदा येऊन गेला होता, त्यामुळे त्याला एकूणएक यंत्रणेची माहिती होती. या स्थानकात प्रयोगासाठी लागणाऱ्या विविध प्रयोगशाळा होत्या. मुख्यत्वे अंतराळातील वेगवेगळ्या ताऱ्यांचा वेध घेण्यासोबतच, शून्य गुरुत्वीय बल व निर्वात पोकळीतील प्रयोगांसाठी या अवकाशस्थानाची स्थापना करण्यात आली होती. यापूर्वी रशिया व अमेरिकेनं संयुक्तपणे बऱ्याच मोहिमा राबवल्या होत्या.

आताची मोहीम मुख्यत्वे भारतीय होती. शिवाय काही महत्त्वाचे प्रयोगही करायचे होते. प्रयोगात अमेरिकेचं महत्त्वाचं सहकार्य लाभणार होतं, म्हणूनच लक्ष्मीची निवड करण्यात आली होती.

थोड्या कालावधीनंतर डॉ. मिलिंद ताजेतवाने होऊन मुख्य कक्षात आले होते. त्यापाठोपाठ लक्ष्मीही हजर झाली. नियंत्रणकक्षात साकोराव्ह होता. तो अवकाश स्थानकातील वातावरणाविषयी काही नोंदी घेण्यात व्यस्त होता. डॉ. मिलिंद काच तावदानातून समोरच्या असंख्य लुकलुकणाऱ्या ताऱ्यांकडे पाहत म्हणाले,

''लक्ष्मी, काय विहंगम दृश्य आहे नाही? ...आसमंत कसा भरून निघाला आहे.''

लक्ष्मीच्या बऱ्याच मोहिमा झाल्यामुळे तिला हे दृश्य नवीन नव्हतं; पण डॉ. मिलिंदची पहिलीच मोहीम असल्यानं त्यांना नावीन्य होतं.

''होय मिलिंद... पृथ्वीकडे बघ...'' लक्ष्मीनं निर्देश केला.

दोघंही समवयस्क असल्यानं एकमेकांना एकेरी नावानंच संबोधत होते.

डॉ. मिलिंदनी पृथ्वीकडे पाहिलं आणि हर्षोल्हसित होत म्हणाले,

''वॉव ऽ ऽ... काय छान दृश्य आहे... पृथ्वी एखाद्या नववधूसारखी दिसत आहे... इथून तिचं महत्त्व आपल्याला कळतंय... तिथे मात्र आपण तिचा ऱ्हास करत आहोत.''

''खरंच! मिलिंद... कुठल्याही गोष्टीचं महत्त्व लांब गेल्यानंतरच कळतं. तसंच पृथ्वीचंही आहे. तिच्याच जतनासाठी आपण इथे आहोत. तिच्यावर अरिष्ट येऊ नये, म्हणूनच या स्थानकाचीही स्थापना झालेली आहे.'' लक्ष्मीनं हेतू स्पष्ट केला.

''बरोबर आहे! पृथ्वीचाही आपण विचार करायला हवा.'' डॉ. मिलिंद मान डोलवत स्मित करत म्हणाले.

''मिलिंद, आपल्याला आता काही प्रयोगांना सुरुवात करायला हवी.'' लक्ष्मी म्हणाली.

''जरूर!... मला वाटतं, आपण आणलेल्या उंदरांच्या नमुन्यावर प्रथम प्रयोग करू यात.'' डॉ. मिलिंदनी सुचवलं.

''ठीक आहे!''

आणि दोघंही साकोराव्ह असलेल्या नियंत्रणकक्षेत आले. तिथे त्याच्याशी चर्चा झाली. साकोराव्ह सतत भारतातील श्रीहरीकोटातील नियंत्रणकक्षाच्या संपर्कात होता. लक्ष्मी व डॉ. मिलिंदनंही तेथील प्रमुख शास्त्रज्ञांशी चर्चा करून पुढील प्रयोगांची दिशा ठरवली होती.

लक्ष्मी व डॉ. मिलिंद एका प्रयोगशाळेत आले. तेथे एका स्पेस सूटमध्ये ठेवलेले उंदीर बाहेर काढण्यात आले. दोन उंदरांपैकी एक कर्करोगग्रस्त होता, तर दुसरा सर्वसाधारण होता. याशिवाय कर्करोगांच्या वेगवेगळ्या पेशींचे नमुनेही आणले होते. या पेशींवर अतिसूक्ष्म गुरुत्वीय बलांचा काही परिणाम होतो का? हा प्रमुख हेतू त्यामागचा होता.

लक्ष्मी व डॉ. मिलिंद दोघंही कामाला लागले. कर्करोगग्रस्त उंदराला त्यांनी एका विशिष्ट तापमान, दाब आणि गुरुत्वीय बलाला ठेवून दिलं. त्याच वेळी सर्वसाधारण उंदरालाही त्याच अटी लागू करण्यात आल्या. याशिवाय कर्करोगग्रस्त पेशीही चंचूपात्रात ठेवून, विशिष्ट उष्णता आणि दाब निर्माण करणाऱ्या काचेच्या पेटीत ठेवण्यात आलं.

त्याच वेळी दुसऱ्या एका प्रयोगशाळेत गहू, तांदूळ, ज्वारीसारख्या धान्यांच्या बियाणांचं संवर्धन करण्यात आलं. दाब, तापमान, गुरुत्वीय बल यांच्यात बदल करून, तेही ठेवण्यात आलं.

किमान दोन ते तीन दिवस डॉ. मिलिंद व लक्ष्मी प्रयोग करत होते. पुढे तीन महिने यावर होणारे परिणाम ते पाहणार होते.

आठ दिवसांनंतर त्यांनी सर्व नमुन्यांची तपासणी केली होती. उंदीर किंवा बियाणांमध्ये काहीही फरक जाणवला नव्हता. म्हणून डॉ. मिलिंदनी गुरुत्वीय बलाची मात्रा बदलण्याची सूचना केली होती. त्यानुसार दाब व गुरुत्वीय बल बदलण्यात आलं, शिवाय तापमानात वाढ करण्यात आली... आणि पुनश्च परिणामांची वाट ते पाहू लागले.

दरम्यान डॉ. मिलिंद व लक्ष्मीनं, साकोराव्हच्या साहाय्यानं स्पेसवॉक घेतला होता. लक्ष्मीनं यापूर्वी तीन वेळा स्पेसवॉक घेतला होता. डॉ. मिलिंदना मात्र स्पेसवॉक हा वेगळाच अनुभव ठरला होता. वेळोवेळी दोघंही प्रयोगांचं परीक्षण करून घेऊ लागले. कमी-अधिक प्रमाणात, थोड्याफार प्रमाणात परिणाम मिळाले होते.

एक महिन्यानंतर मात्र जेव्हा डॉ. मिलिंद व लक्ष्मीनं प्रयोगशाळेत प्रवेश केला, तेव्हा ते अचंबित झाले होते, कारण कर्करोगग्रस्त उंदराची गाठ संपूर्णत: नष्ट झाली होती; पण त्याच वेळी दुसरा उंदीर मेलेला पाहून ते आश्चर्यचकित झाले होते. लक्ष्मीनं तातडीनं वातावरणातील सर्व अटींची नोंद करून घेतली; पण दुसऱ्या उंदराच्या मृत्यूनं मात्र डॉ. मिलिंद गंभीर झाले होते. लक्ष्मी म्हणाली,

''मिलिंद! हे कसं शक्य आहे? नॉर्मल उंदीर मरूच कसा शकतो?... व त्याच वेळी कर्करोगग्रस्त उंदीर संपूर्णपणे बरा झालेला आहे. धिस इज रिअली अ प्रॉमिनंट रिझल्ट.''

''निश्चितच लक्ष्मी. मीही त्याचाच विचार करतोय. कदाचित याला गुरुत्वीय बलच कारणीभूत असावं.'' डॉ. मिलिंद म्हणाले.

''पण उंदीर का मेला असावा?'' लक्ष्मीचा साहजिक प्रश्न.

''याला कारण गुरुत्वीय बलच असावं. कारण जसा कर्करोगपेशीवर गुरुत्वीय बलाचा परिणाम होऊन ते बाद झालं, तसंच, तेच बल नॉर्मल उंदराच्या पेशींना संवेदनशील ठरलं असावं. म्हणून कदाचित त्याचा मृत्यू झाला असावा; पण याचा सखोल अभ्यास करणं गरजेचं आहे.'' डॉ. मिलिंदनी

अंदाज व्यक्त केला. त्याच वेळी साकोराव्ह धावतपळतच प्रयोगशाळेत आला होता आणि घाईनं म्हणाला, ''सर! त्या प्रयोगशाळेत बघा काय झालं ते!''

तिघंही शेजारच्या प्रयोगशाळेकडे धावले व पाहतच राहिले. संपूर्ण प्रयोगशाळा गहू व तांदळांच्या रोपट्यांनी भरली होती... आणि ती रोपटी अजूनही वाढतच होती. लक्ष्मी काळजीनं म्हणाली,''मिलिंद! काय आहे हे? या वेगानं रोपटी वाढत गेली, तर हे अवकाशस्थानही यांना कमी पडेल; ही अनियंत्रित वाढत आहेत.''

प्रयोगशाळा संपूर्ण रोपट्यांनी भरून, आताशी ते बाहेर येऊ पाहत होते. डॉ. मिलिंद विचार करत म्हणाले, ''लक्ष्मी!... दाब, तापमान, गुरुत्वीय बल या अटी आपण ठेवल्या होत्या, त्या सर्व नॉर्मल कर. प्रथम यांची वाढ थांबवणं गरजेचं आहे; नाहीतर ते आपलाही जीव घेतील. गोऽऽ''

डॉ. मिलिंदनी गांभीर्याचा संकेत देताच, लक्ष्मीनं तातडीनं हालचाल करून, सर्व अटी शून्यवत केल्या... आणि काही क्षणांतच वनस्पतींची वाढ थांबली होती. डॉ. मिलिंद उत्साहानं म्हणाले,

''लक्ष्मी! बघितलंस का? आपण ज्या अटी ठेवल्या होत्या, त्या खूपच महत्त्वाच्या आहेत. कर्करोगपेशींची वाढ थांबून नायनाट होतात, शिवाय कमी वेळेत वनस्पतीची वाढही होते. खरंच खूप महत्त्वाचे परिणाम आहेत. तू सर्व अटींची नोंद केली आहेस ना?''

''होय! मी आधीच त्यांची नोंद करून ठेवलीय.'' लक्ष्मी म्हणाली.

''कारण पृथ्वीवर याचा आपल्याला उपयोग करता येईल.'' डॉ. मिलिंद आश्वासक स्वरात उत्तरले.

''तो कसा काय?'' लक्ष्मीचा प्रश्न.

''सखोल अभ्यासानंतर कर्करोगरुग्णांना व शेतकऱ्यांना याचा उपयोग आपल्याला करून देता येईल.'' डॉ. मिलिंदनी उपयोग सांगितला.

लक्ष्मी, डॉ. मिलिंदच्या पृथक्करणाकडे पाहतच राहिली होती. या उत्साहवर्धक प्रयोगानंतर, दोघांनीही पुढचे काही प्रयोग विचारपूर्वक करण्याचं ठरवलं.

मध्ये पंधरा दिवस गेले. प्रत्येक जण आपापल्या कामात व्यग्र राहिला.

डॉ. मिलिंदही सिद्धान्तासोबतच काही प्रयोगांचा पाठपुरावा करू लागले.

एका निवांत क्षणी साकोराव्ह आसमंताचा वेध घेत होता. त्याच वेळी

त्याला एके ठिकाणी हालचाल जाणवली. प्रथम त्यानं दुर्लक्षित केलं. पण नंतर लक्ष जाताच पुन्हा ती वस्तू हलू लागली. तो सावरून बसला. दुर्बिणीनं त्यानं वेध घेण्याचा प्रयत्न केला आणि क्षणभर स्तब्ध झाला. ती वस्तू वेगानं येऊन पृथ्वीच्या बाहेरील कक्षेत स्थिर झाली होती. तिची हालचाल बंद झाली असली, तरी ती स्तब्ध होती. साकोराव्हनी इंटरकॉमच्या साहाय्यानं डॉ. मिलिंद व लक्ष्मीला तातडीनं बोलावून घेतलं.

डॉ. मिलिंदला साकोराव्हानं ती वस्तू दाखवताच, ते चिंतित झाले. ते म्हणाले, ''साकोराव्ह! ही काहीतरी वेगळीच वस्तू दिसतेय. त्याचा आवाकाही कळत नाहीये. उपग्रहाच्या साहाय्यानं प्रकाशचित्रं घेतोस का?''

साकोराव्हनं आज्ञेचं पालन करताच, उपग्रहाच्या साहाय्यानं त्रिमिती प्रकाशचित्रं घेतली... आणि डॉ. मिलिंद व लक्ष्मी बघतच राहिले.

ते एक अवाढव्य यान होतं. अतिशय प्रगत. वेगळ्याच आकाराचं. अवकाशस्थानकाच्या किमान पाच पटीनं त्या यानाचा आकार होता. असं यान पृथ्वीवरील कुठल्याही राष्ट्राचं नव्हतं.

तरीही साकोराव्हनं पृथ्वीवर संपर्क साधून, खात्री करून घेतली. असं यान पृथ्वीवासीयांचं नसल्याचा निर्वाळा त्यांनी दिला. शिवाय पृथ्वीवरूनही ती वस्तू डिटेक्ट करण्यात आली होती... आणि ती 'अनआयडेंटिफाइड ऑब्जेक्ट' असल्याचा निर्वाळा पृथ्वीवरून आला होता.

साकोराव्ह त्या यानावर सतत लक्ष ठेवून होता. प्रकाशचित्रात आत काय आहे, काहीच समजत नव्हतं. डॉ. मिलिंद गंभीरपणे म्हणाले,

''लक्ष्मी!... हे एक वेगळंच प्रकरण उद्‌भवलं आहे. याच्या आत काय आहे, काहीच कळत नाहीये. हे यान पृथ्वीवरचं नाहीये. ते बाहेरचं आहे.''

''बाहेरचं म्हणजे?'' लक्ष्मीचा गोंधळलेला स्वर.

''माहीत नाही!... या वेळी सांगणं कठीण आहे. आपल्याला काही तपासण्या करून घ्याव्या लागतील. शिवाय आत काय आहे, याचाही वेध घ्यावा लागणार आहे.'' डॉ. मिलिंदनी दिशा ठरवण्याचा प्रयत्न केला.

''नेमकं काय करायचं, सर?'' साकोराव्हनं विचारलं.

''त्या वस्तूची गॅमा आणि इलेक्ट्रॉन स्पेक्ट्रोस्कोपी आपल्याला घ्यावी लागेल.''

''त्यानं काय होईल?'' लक्ष्मीनं शंका व्यक्त केली.

''या किरणांची भेदनक्षमता मोठी असल्यानं आतील प्रकाशचित्रं मिळू शकतील आणि त्यामुळे आपल्याला आत नेमकं काय आहे, ते कळू शकेल.''

डॉ. मिलिंदनी समजून सांगितलं.

साकोराव्ह या सर्वच स्पेक्ट्रोस्कोपीमध्ये निष्णात होता. त्यानं लागलीच यंत्रणा सुरू करून, गॅमा व इलेक्ट्रॉन बीम प्रोब त्या वस्तूच्या दिशेनं केली आणि क्षणार्धात कॉम्प्युटरवर प्रकाशचित्रं दिसू लागली.

ती चित्र पाहताच तिघंही आश्चर्यचकित झाले. आत विशिष्ट आकाराची असंख्य काळी शरीरे होती. ते खूपच प्रमाणात होते आणि त्यांची हालचालही होत होती. लक्ष्मी म्हणाली, ''मिलिंद! तू म्हणालास ते बरोबर आहे, ते बाहेरचेच आहेत. परग्रहावरील. त्यांच्या शरीराचा आकार मानवासारखा नाहीच; आता काय करायचं?''

या प्रश्नावर कुणाकडेच काहीही उत्तर नव्हतं. साकोराव्ह, लक्ष्मी गोंधळले होते; पण डॉ. मिलिंद शांत होते. ते विचार करत होते.

तेवढ्यात साकोराव्हनं कॉम्प्युटरवरील एका संकेताकडे लक्ष वेधून घेतलं. त्याचं पृथक्करण करताच तो संकेत असा होता,

''हे पृथ्वीवासीय. तुमच्या अस्तित्वाची दखल आम्ही कधीच घेतलीय. या क्षणी आम्ही तुम्हाला नेस्तनाबूत करू शकतो; पण तसं आम्ही करणार नाही. कारण शंभर प्रकाशवर्षं प्रवास करून तुमच्या ग्रहाचा शोध आम्हाला लागलाय. आमचा ग्रह संकटात असल्यानं स्थलांतरासाठी तुमचा ग्रह आम्हाला हवा आहे. आमचं अस्तित्व आम्हाला टिकवायचंय; पण त्याच वेळी तुमचंही अस्तित्व आम्हाला धोक्यात आणायचं नाहीये. त्यामुळे आम्हाला सौहार्दपूर्ण संबंध हवे आहेत. तर तुम्ही आम्हाला मदत करणं इष्ट आहे. पृथ्वीवर आम्ही जाऊ, तेव्हा तुमचा अडथळा आम्हाला नको आहे. आपण सगळेच आनंदात राहू.''

संकेताचा मथितार्थ कळताच डॉ. मिलिंद, लक्ष्मी, साकोराव्ह हादरले होते. शंभर प्रकाशवर्षं प्रवास करून आलेले आहेत म्हटल्यानंतर ती प्रगत जीवसृष्टी असल्याचं डॉ. मिलिंदच्या लक्षात आलं. या क्षणी त्यांच्या कलानंच घ्यावं लागणार, हे त्यांच्या ध्यानात आलं; पण संकेतातील गर्भित धमकीनं ते मात्र गंभीर झाले होते. त्यांच्या सात्त्विक हेतूबद्दल डॉ. मिलिंदना शंका आली होती. ते साकोराव्हला म्हणाले,

''साकोराव्ह, जरा माइंड युनिट सुरू कर बरं.''

माइंड युनिटची यंत्रणा पृथ्वीवर नुकतीच विकसित करण्यात आली होती. या यंत्रणेनं समोरच्याच्या मनातील सद्‌हेतूबद्दल कळत असे. साकोराव्हनं लागलीच यंत्रणा सुरू केली... आणि डॉ. मिलिंद मात्र त्यानंतर गर्भगळित झाले होते. लक्ष्मी व साकोराव्हही सुन्न झाले होते. कारण परग्रहवासीयांचा हेतू दुष्ट होता. पृथ्वीवरील मानवाला गुलाम बनवून त्याचं उच्चाटन करण्याची त्यांची भयानक योजना होती. डॉ. मिलिंद क्षणभर स्तब्ध झाले. साकोराव्ह स्तिमित झाला.

लक्ष्मीनं पृथ्वीकडे पाहिलं आणि तिच्या डोळ्यांत अश्रू तरळून गेले.

डॉ. मिलिंदच्या लक्षात येताच, त्यांनी तिचा खांदा हळूच आश्वासक हेतूनं दाबला आणि धीर दिला... त्यांनाही गलबलून आलं. पृथ्वीवरील मानवी चेहरे त्यांच्या डोळ्यांपुढे तरळू लागले.

...आणि समोरचं दृश्य पाहून ते तिघंही हैराण झाले. अजून किमान शंभर अवाढव्य यानं तेथे येऊन दाखल झाली होती. प्रत्येकाचंच लक्ष्य पृथ्वी होतं. अजून कदाचित बरेच येऊ घातले असतील. या प्रत्येकाचाच सामना करणं आता डॉ. मिलिंद, लक्ष्मी व साकोराव्ह यांच्या क्षमतेपलीकडे होतं. लक्ष्मी व साकोराव्हनं असह्यपणे डॉ. मिलिंदकडे पाहिलं. त्यांची जीवघेणी अपेक्षा मात्र डॉ. मिलिंदला घायाळ करून गेली. ते दोघंही त्यांच्याकडे अपेक्षेनं पाहत होते, कारण यातून तेच मार्ग काढू शकतील, याची खात्री लक्ष्मीला होती; पण आता वेळच नव्हता.

डॉ. मिलिंद निकरानं म्हणाले,

''साकोराव्ह! न्यूट्रॉन प्रोब त्या यानावर टाकून माहिती घे.'' डॉ. मिलिंदच्या मनात काय विचार घोळत होते, ते कुणालाच कळत नव्हतं.

साकोराव्हनं लागलीच हालचाल केली... आणि न्यूट्रॉनबीमनं यानाचं पृथक्करण केलं...

परिणाम पाहताच डॉ. मिलिंदच्या डोळ्यांत चमक दाटून आली आणि ते शांतपणे नियंत्रणकक्षातील खुर्चीत बसले... त्यांचे विचार आता मात्र धावू लागले. डॉ. मिलिंदनी डोळे मिटून घेतले... या कृतीनं मात्र लक्ष्मी गोंधळून गेली.

तिकडे परग्रहवासीयांची सर्वच यानं एकाच वेळी पृथ्वीकडे जाऊ लागली.

साकोराव्ह व लक्ष्मी त्रयस्थपणे पाहत राहिले. लक्ष्मी म्हणाली,

''मिलिंद पृथ्वीकडे त्यांनी मार्च केला आहे. ओ गॉड, सेव्ह माय अर्थ!'' लक्ष्मी आकांतानं म्हणाली होती. त्यावर डॉ. मिलिंदनं फक्त स्मित केलं होतं. त्यांचे डोळे अजूनही मिटलेलेच होते... त्यांच्या स्मितहास्याकडे मात्र लक्ष्मी व साकोराव्ह अविश्वासानं पाहत राहिले. या क्षणी लक्ष्मीला त्यांच्या या कृतीचा प्रथम रागच आला; पण ती काहीच बोलू शकली नाही.

...आणि तेवढ्यात परग्रहवासीयांचं ते अवाढव्य यान एक-एक करून उद्ध्वस्त होऊ लागलं. स्फोट होऊन अवकाशात ज्वाळा पसरू लागल्या. त्याचं प्रतिबिंब अवकाशस्थानकावर दिसू लागलं. या आविष्काराकडे लक्ष्मी आणि साकोराव्ह पाहतच राहिले.

मात्र ज्वाळांकडे पाहत डॉ. मिलिंद प्रथमच गडगडाटी हसले... आणि त्या हसण्यात लक्ष्मी आणि साकोराव्हही सामील झाले. लक्ष्मीच्या डोळ्यांत या वेळीही अश्रू होते; पण ते आनंदाश्रू होते. त्यांची पृथ्वी वाचली होती. परग्रहवासीयांचा निसर्गानंच नायनाट केला होता. लक्ष्मी, डॉ. मिलिंदजवळ येत अश्रू पुसत म्हणाली,

''मिलिंद? हे तू ... ऽ ऽ,'' मध्येच डॉ. मिलिंद म्हणाले,

''नाही लक्ष्मी, मी नाही, आपल्या पृथ्वीनं आणि या निसर्गानं.''

''कसं काय?'' लक्ष्मीचा साहजिक प्रश्न.

डॉ. मिलिंद सावरून बसत म्हणाले,

''कुठलाही पर्याय डोळ्यांसमोर दिसत नसताना त्यांचं यान कुठल्या पदार्थानं बनलेलं आहे हे जाणून घेण्याची इच्छा झाली, म्हणून मी साकोराव्हला न्यूट्रॉनबीमनं पृथक्करण करण्यास सांगितलं... आणि यात मला हायड्रोजन वायूचं प्रमाण असल्याचं जाणवलं... आणि तिथेच मी निवांत झालो. माझी पृथ्वी वाचली होती. कारण पृथ्वीच्या वातावरणात ओझोन वायूचा थर आहे. त्यात ऑक्सिजन हे संयुग आहे. तेच जर हायड्रोजनच्या सान्निध्यात आलं, तर ज्वलनांक वाढतो. हेच माझ्या लक्षात आलं... आणि मी निवांत झालो. अशी परग्रहवासीयांची हजारो यानं जरी आली, तरी ती पृथ्वीवर पोहोचू शकणार नव्हती.'' डॉ. मिलिंदनी स्पष्टीकरण दिलं.

''म्हणजे पृथ्वीनं आपलं व मानवाचं संरक्षण स्वत:च केलं म्हणायचं.'' साकोराव्ह उत्तरला.

‘‘होय!... ओझोनचा थर हा मानवासाठी जीवनदायी आहेच; पण या वेळी तो थर मानवावरील अरिष्ट दूर होण्यास कारणीभूत ठरलाय.’’ डॉ. मिलिंद म्हणाले.

लक्ष्मी डॉ. मिलिंदकडे कौतुकानं पाहत म्हणाली,

‘‘मिलिंद! यू आर रिअली अ जिनिअस... या मोहिमेवर तुझी निवड का झाली, याची खात्री पटली. आज केवळ तुझ्यामुळे कल्पनेपलीकडचं अरिष्ट परतवलं गेलंय.’’

‘‘नाही लक्ष्मी! मी निमित्तमात्र. पृथ्वी स्वत:च आपलं व मानवाचं रक्षण करत असते. शेवटी संकट टळलं हे महत्त्वाचं. ती बघा आपली वसुंधरा.’’


डॉ. मिलिंदनं दोघांचंही तिकडे लक्ष वेधलं होतं. पृथ्वीकडे तिघांचंही लक्ष जाताच, तिचं मोहक रूप पाहून ते भारावले आणि तिघांच्याही डोळ्यांत नकळत आनंदाश्रू तरळून गेले... साकोराव्ह आणि लक्ष्मीनं पृथ्वीसोबतच डॉ. मिलिंदलाही कडक सॅल्यूट ठोकला होता. शेवटी उपरे उपरेच राहिले होते.

◆


**डॉ. संजय ढोले यांचे साहित्य**

- प्रेमाचा रेणू
- अश्मजीवं
- अंतराळातील मृत्यू
- संकरित
- डिंभक
- प्लँटोन
- खुजाबा
- राफिणू
- पाठलाग
- दूरचे प्रवासी
- झाडाचं गुपित
- अवकाशातील दूत
- थर्ड मॅन

# पुस्तकाच्या पानांतून




## डिलिव्हरिंग हॅपिनेस

**टोनी शे**

अनुवाद

**सुनीति काणे**

पृष्ठे : २६८
किंमत : ४३०

*सर्जनशीलता, प्रयोगशीलता आणि अनुभव ही त्रिसूत्री... व्यवसायाला नेते यशोमार्गावरती*

## नफ्याच्या शोधात

**गांडूळशेती**

*प्रथम, ते तुमच्याकडे दुर्लक्ष करतात, नंतर ते तुमची खिल्ली उडवतात, त्यानंतर ते तुमच्याशी भांडतात, अखेरीस तुमचा जय होतो!*

**– म. गांधी**

मी नऊ वर्षांचा होतो, तेव्हा मी कोण आहे हे

गांधीजींच्या खिसगणतीतही नसणार याबद्दल माझी पक्की खात्री आहे. तसेच गांधीजी म्हणजे कोण याची मलासुद्धा तेव्हा काहीही कल्पना नसणार, याबद्दलही मला खात्री वाटते; परंतु जर गांधीजींना मोठ्या प्रमाणावर गांडूळखत बनवून खूप पैसे मिळवण्याच्या माझ्या स्वप्नाची आणि धोरणीपणाच्या योजनेची पुसटशी कल्पना असती, तर पहिल्या क्रमांकावरचा गांडूळखत उत्पादक आणि विक्रेता बनण्यासाठी मला प्रोत्साहन द्यायला त्यांनी हे बोधवचन मला नक्कीच ऐकवलं असतं.

दुर्दैवाने त्यांचा हा सुज्ञपणाचा सल्ला मला ऐकवायला गांधीजी माझ्या घरी आले नाहीत. त्याऐवजी माझ्या नवव्या वाढदिवशी मी आई-वडिलांना विनंती केली की, आपल्या घरापासून उत्तरेला, तासाभराच्या अंतरावर असलेल्या सोनोमा गावातील गांडूळखत प्रकल्पावर तुम्ही मला घेऊन जावं. सध्या आमच्या भागातला तो सर्वांत मोठा गांडूळखत विक्रेता होता. त्या माणसाला चुरशीची टक्कर देण्याचा माझा इरादा आहे, याची माझ्या आई-वडिलांना थोडीदेखील कल्पना नव्हती.

‘यात निदान शंभर जिवंत गांडुळं आहेत’ अशी हमी देणाऱ्या गांडूळखताच्या पेटीसाठी माझ्या आई-वडिलांनी ३३डॉलर्स आणि ४५सेन्ट्स मोजले. गांडुळाचे दोन समान तुकडे केले; तर ते दोन्ही तुकडे वाढून त्यांची दोन स्वतंत्र गांडुळं बनतात, असं मी एका पुस्तकात वाचलं होतं, हे मला आठवलं. ही मोठी फायद्याची गोष्ट होती; परंतु त्याला खूपच कष्ट पडले असते. म्हणून त्याऐवजी मी एक सुलभ योजना आखली. मी आमच्या घरामागच्या मोकळ्या जागेत गांडुळांसाठी एक पेटी तयार केली. मुलांना खेळण्यासाठी ज्या पेटीत वाळू भरलेली असते, तीच पेटी मी उपयोगात आणली. त्या पेटीच्या तळाला मी एक तारेची जाळी घातली आणि पेटीत वाळूऐवजी माती भरली. मी त्या मातीत आणलेल्या खोक्यांमधलं गांडूळखत मिसळून टाकलं. शंभर गांडुळांना आता संचार करायला भरपूर जागा मिळणार होती; त्यामुळे ते नव्या गांडुळांना भरभर जन्म देतील, असं मला वाटू लागलं.

मी दररोज काही कच्च्या अंड्यांमधला पिवळा बलक त्या मातीवर टाकत असे. काही व्यावसायिक तालीमबाज सकाळच्या नाश्त्यासाठी कच्ची अंडी खातात, असं मी ऐकून होतो. त्याप्रमाणेच अंड्याच्या पिवळ्या बलकाच्या खुराकावर पोसलेली गांडुळं भरभर नव्या गांडुळांना जन्म देतील, असा माझा

होरा होता. मी ज्या पैशांबद्दल स्वप्न पाहत होतो, ते गांडूळखत विकून मला मिळण्याची सुतराम शक्यता नाही, याची माझ्या आई-वडिलांना पक्की खात्री वाटत होती; तरीही त्यांनी गांडुळांना अंड्याच्या पिवळ्या बलकाचा खुराक देण्याची मला परवानगी दिली. गांडुळं अंड्याचा पिवळा बलक खात असली, तरी मी आणि माझे भाऊ कमी कोलेस्ट्रॉल असलेला अंड्याचा पांढरा बलक खात असणार ही गोष्ट उघडच होती! आमच्या रक्तातली कोलेस्ट्रॉलची पातळी ज्यामुळे वाढेल, अशा गोष्टी आम्ही खाऊ नयेत, याबद्दल माझ्या आईचा कटाक्ष असे. टीव्हीवरील स्थानिक बातम्यांमध्ये तिने बहुधा या संदर्भातली माहिती मिळवली असावी; त्यामुळेच ती कोलेस्ट्रॉलबद्दल एवढी धास्ती घेत होती.

कच्च्या अंड्याच्या पिवळ्या बलकाच्या खुराकावर तीस दिवस ती गांडुळं पोसल्यानंतर मी त्यांच्या वाढीचा अंदाज घेण्याचं ठरवलं. मी त्या पेटीतल्या मातीत खोदून गांडुळाची पिलं नजरेला पडतात का, हे पाहू लागलो. दुर्दैवाने मला गांडुळाचं एकही पिल्लू दिसलं नाही. त्याहूनही चिंताजनक गोष्ट म्हणजे मला त्यात एकही मोठं गांडूळ आढळलं नाही. त्या पेटीतली माती मी तासभर उकरली. त्यातलं प्रत्येक गांडूळ गायब झालं होतं. बहुधा पेटीच्या तळाशी असलेल्या जाळीतून ती सारी गांडुळं बाहेर निसटून बागभर पसरली असावीत किंवा कच्च्या अंड्याच्या वासाने आकृष्ट झालेल्या पक्ष्यांनी ती फस्त केली असावीत.

माझ्या गांडूळखताच्या उदयोन्मुख प्रकल्पाचं अशा प्रकारे दिवाळं फुकावं लागलं. मी उसनं अवसान आणून माझ्या आई-वडिलांना म्हणालो की, गांडूळखत तयार करणं कंटाळवाणंच वाटलं असतं; परंतु अयशस्वी झाल्याबद्दल मनातून मला वाईट वाटत होतं. जर थॉमस एडिसन अजून जिवंत असते, तर माझ्या घरी येऊन त्यांनी मला अपयशाबद्दलचे विचार ऐकवले असते :

*‘I failed my way to success.’*

*(माझ्या यशाच्या मार्गात मी अयशस्वी झालो.)*

– थॉमस एडिसन

ते बहुधा इतर उद्योगांमध्ये खूप व्यग्र असावेत, कारण गांधीजींप्रमाणे तेसुद्धा माझ्या घरी आले नाहीत. कदाचित ते दोघं एकमेकांशी गप्पा मारण्यात

मग्न असावेत.

### मोठं होताना

माझ्या आई-वडिलांनी युनिव्हर्सिटि ऑफ इलिनॉयमधून पदव्युत्तर शिक्षणासाठी तैवानहून अमेरिकेत स्थलांतर केलेलं होतं. तिथेच त्यांची भेट झाली आणि ते विवाहबद्ध झाले. माझा जन्म इलिनॉय राज्यात झालेला असला, तरी त्या काळाबद्दल दोनच आठवणी माझ्या स्मृतीत राहिल्या आहेत– एक आठवण आहे, बारा फूट उंचीवरच्या फळीवरून तरण तलावात उडी मारण्याची आणि दुसरी आठवण आहे, काजवे पकडण्याची. सुरुवातीच्या आठवणी अगदी पुसट असतात. या आठवणी भिन्न काळातील असाव्यात, असं मला वाटतं. कारण दोन वर्षांचं मूल सूर मारताना काजवा पकडू शकेल ही गोष्ट असंभवनीयच आहे.

मी पाच वर्षांचा असताना माझ्या वडिलांना कॅलिफोर्नियात नोकरी मिळाली आणि आमचं कुटुंब गोल्डन गेट ब्रिजच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या सॅन फ्रान्सिस्कोच्या उत्तरेतील मरीन काउन्टीला हललं. आमचं घर स्कायवॉकर रँचपासून (इथे स्टार वॉरसाठी सुप्रसिद्ध असलेला जॉर्ज लुकास राहत असे आणि आपलं चित्रपट साम्राज्य चालवीत असे) वीस मिनिटांच्या कारच्या अंतरावरील लुकास व्हॅलीमध्ये होतं.

माझे आई-वडील हे आशियाई अमेरिकन्सचं चालतं-बोलतं प्रतीक होते. माझे वडील शेव्हरॉन ऑइल कंपनीत केमिकल इंजिनीअर म्हणून काम करत होते, तर माझी आई समाजसेविका होती. माझ्या आणि माझ्यापाठच्या दोन भावांच्या शैक्षणिक गुणवत्तेबद्दल माझ्या आई-वडिलांच्या विशेष अपेक्षा होत्या. अ‍ॅण्डी माझ्याहून दोन वर्षांनी लहान होता. आम्ही कॅलिफोर्नियात आल्यावर चार वर्षांनी माझा सर्वांत लहान भाऊ डेव्हिड याचा जन्म झाला होता.

मरीन काउन्टीत आशियाई कुटुंबांचं फारसं वास्तव्य नव्हतं; परंतु माझ्या आई-वडिलांनी तिथे राहणाऱ्या दहाही जणांचा शोध लावला. या कुटुंबांतील आम्ही लहान-थोर सर्व जण नियमितपणे एकत्र जमू लागलो आणि एकत्र जेवण करत खूप वेळ गप्पागोष्टींमध्ये घालवू लागलो. मुलं जेवणानंतर टीव्ही

बघत, तर त्यांचे आई-वडील वेगळ्या खोलीत बसून चर्चा करत आणि आपापल्या मुलांबद्दल बढाया मारत. आशियाई संस्कृतीचं ते अविभाज्य अंग होतं. अनेक माता-पिता आपल्या अपत्यांच्या कर्तबगारीवरून स्वत:चं यश आणि समाजातलं स्थान मापत. मुलांचं यश ते पुरस्काराप्रमाणे फुशारकीने मिरवत अर्थात्त आम्हीही त्यांचं प्रगतिपुस्तकच होतो!

आशियाई आई-बापांना तीन भिन्न विभागातलं मुलांचं यश अपेक्षित असे. पहिला विभाग होता 'शैक्षणिक' यशाचा. शाळेत उत्तम गुण मिळवणं, समाजमान्यता किंवा कोणत्याही प्रकारचा पुरस्कार मिळवणं, सॅट (SAT-स्कॉलॅस्टिक ॲप्टिट्यूड टेस्ट. कॉलेज प्रवेशासाठी संपूर्ण अमेरिकाभर घेतली जाणारी ही प्रवेश परीक्षा असते) परीक्षेत उत्तम गुण मिळवणं किंवा शाळेच्या गणिताच्या संघात सहभाग असणं त्या दृष्टीने महत्त्वाचं मानलं जात असे. शाळेनंतर तुम्हाला कोणत्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळवता येतो ही अत्यंत निर्णायक गोष्ट समजली जात असे. मुलाला हार्वर्ड युनिव्हर्सिटित प्रवेश मिळाला की, आई-वडिलांना शेखी मिरवायची सर्वांत मोठी संधी लाभत असे.

दुसऱ्या विभागात 'व्यावसायिक' यशाचा समावेश असे. वैद्यकशास्त्राची पदवी किंवा पीएच.डी. मिळवणं हे सर्वोत्कृष्ट यश समजलं जात असे. कारण, या दोन्ही पदव्यांमुळे नावापुढे डॉक्टर हे बिरुद लावता येत असे. तुम्ही 'मिस्टर शे' न राहता 'डॉ. शे' हे संबोधन प्राप्त करून घेतलेलं असे.

तिसरा विभाग होता, एखादं वाद्य वाजवण्यावर प्रभुत्व मिळवण्याचा. जवळजवळ प्रत्येक आशियाई मुलावर पियानो किंवा व्हायोलिन अथवा ही दोन्ही वाद्यं शिकण्याची सक्ती केली जात असे. प्रत्येक वेळी सगळी कुटुंबं एकत्र जमल्यावर, जेवणानंतर मोठ्यांपुढे मुलांना वाद्यं वाजवून दाखवावी लागत. आई-वडिलांचं मनोरंजन करणं हा वरपांगीचा हेतू असला, तरी आपल्या मुलांची इतरांशी तुलना करता यावी हा त्यामागचा अंत:स्थ हेतू असे.

इतर आशियाई आई-वडिलांप्रमाणेच माझे आई-वडीलसुद्धा शिस्तीच्या बाबतीत कडवे होते. आम्ही या तिन्ही विभागांमध्ये मान्यता मिळवावी हा या कडक शिस्तीमागचा स्पष्ट हेतू होता. मला दर आठवड्याला फक्त तासभरच टीव्ही बघण्याची परवानगी होती. सर्व विषयांत मी फक्त 'ए' ग्रेड मिळवावी, अशी अपेक्षा ठेवली जाई. माध्यमिक शाळेपासून थेट हायस्कूलचं शिक्षण पूर्ण होईपर्यंत माझ्या आई-वडिलांनी मला अनेकदा सरावासाठी 'सॅट'

परीक्षा द्यायला लावली. ‘सॅट’ ही ठरावीक साच्याची परीक्षा असते आणि बहुतेक वेळा, शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ती एकदाच दिली जाते. कॉलेज प्रवेशासाठी ‘सॅट’चे गुण आवश्यक धरले जातात; परंतु मी सहाव्या इयत्तेत असल्यापासूनच माझे आई-वडील माझ्याकडून या परीक्षेचा सराव करून घेऊ लागले.

माध्यमिक शाळेत असताना मी पियानो, व्हायोलिन, ट्रंपेट आणि फ्रेंच हॉर्न ही चार वेगवेगळी वाद्यं वाजवण्याचं शिक्षण घेत होतो. शाळा सुरू असताना या प्रत्येक वाद्याचा मी दररोज अर्धा तास सराव करावा, अशी अपेक्षा असे. वीकेंडला आणि सुट्यांच्या काळात प्रत्येक वाद्याचा मी तासभर सराव करावा, अशी सक्ती असे. उन्हाळ्याच्या सुट्टीत या चार वाद्यांच्या सरावासाठी प्रत्येकी एक तास वाया घालवायला सांगणं ही माझ्या मते अत्यंत क्रूर आणि आगळीवेगळी शिक्षाच होती! उन्हाळी सुट्टीचा ‘सुट्टी’ हा भाग अनुभवण्यासाठी तळमळणाऱ्या मुलांच्या दृष्टीने तर तो अमानुष अत्याचारच होता!


वीकेंड आणि उन्हाळी सुट्टीचा आनंद उपभोगता यावा, या दृष्टीने मी एक पळवाट शोधून काढली. मी सकाळी सहा वाजता उठत असे. त्या वेळी माझे आई-वडील साखरझोपेत असत. खालच्या मजल्यावर जिथे पियानो ठेवलेला होता, तिथे मी जात असे. तिथे गेल्यावर मी प्रत्यक्ष पियानो वाजवण्याऐवजी टेपरेकॉर्डरवर तासाभराची पियानोची ध्वनिफीत वाजवीत असे, जी मी स्वत: रेकॉर्ड करून ठेवली होती. मग सात वाजता मी माझ्या खोलीचा दरवाजा बंद करून व्हायोलिनचं तासाभराचं रेकॉर्डिंग वाजवीत असे. या वेळेत मी ‘बॉइज लाइफ’ मासिक वाचण्याची मजा लुटत असे.

आठवड्याच्या शिकवणीच्या वेळेस या दोन्ही वाद्यांमध्ये माझी अजिबातच प्रगती का होत नव्हती हे आता तुमच्या लक्षात आलंच असेल. मात्र माझ्या पियानो आणि व्हायोलिनच्या शिक्षकांना हे गूढ अजिबात उकलत नसे. त्याबाबतीत मी मंद आहे, अशी त्यांची समजूत झाली असावी. ही सारी वाद्यं शिकून माझा कोणता फायदा होणार हे मला अजिबात उमगत नव्हतं.

(हे वाचून माझी आई खूप भडकणार नाही अशी मी मनापासून प्रार्थना करतो. माझ्या पियानो आणि व्हायोलिनच्या शिकवण्यांवर तिने खर्च केलेल्या सर्व पैशांची खरंतर मी परतफेड करायला हवी!)

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# हिटलर आणि भारत

**वैभव पुरंदरे**

अनुवाद

**जी. बी. देशमुख**

पृष्ठे : १६८
किंमत : २७५

*भारत देश आणि या देशातल्या माणसांविषयी*
*हिटलरच्या मनात असलेल्या द्वेषाची अकथित कहाणी*

### तिसऱ्या साम्राज्यात प्रवेश

दारावर झालेल्या टकटकीच्या वाजवीपेक्षा मोठ्या आवाजानं वर्तमानपत्र वाचण्यात गर्क असलेल्या ए.सी.एन. नांबियारला दचकायला झालं. क्षणार्धात दरवाजावरील थाप एखाद्या मजबूत बाहूने दारावर जोरजोरात लगावलेल्या धडकांच्या आवाजात परिवर्तीत झाली.

तो दिवस होता दि. २७ फेब्रुवारी १९३३

चा आणि वेळ होती संध्याकाळचे ७.००. एक भारतीय पत्रकार आणि वसाहतवादविरोधी आंदोलक असलेला नांबियार त्याच्या मध्य बर्लिनस्थित फ्लॅटमधील बैठकीच्या खोलीतील टेबलपुढे बसला होता. समोर पसरलेल्या सांध्यदैनिकाच्या मुखपृष्ठावरील मजकूर वाचण्यात त्याचं भान हरपलं होतं. राइशटाग म्हणजेच जर्मन संसदेच्या इमारतीत आदल्या रात्री आगडोंब उसळला होता. जनप्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था असते त्या प्रमुख दालनांना कवेत घेत आगीच्या ज्वाळांनी इमारतीच्या सोनेरी घुमटांच्या मधून पार होत संपूर्ण इमारत गिळंकृत केली होती.

उण्यापुऱ्या चार आठवड्यांपूर्वीच जर्मनीचा चांसलर म्हणून शपथ घेतलेल्या ॲडॉल्फ हिटलरनं आग पूर्णपणे विझण्यापूर्वीच त्याच्या नाझी पक्षाच्या विरोधकांवर कारवाईचा वरवंटा फिरविण्यास सुरुवात केली होती. ह्याकरीता त्यानं त्याच्या पक्षाचे सशस्त्र बल म्हणजेच स्टॉर्मट्रुपर्सना (एस.ए.) पाचारण केलं होतं. या एस.ए.ना अलीकडेच पोलिसांचे 'साहाय्यक' म्हणून औपचारिक नियुक्ती देण्यात आली होती.

साम्यवादाकडे कल असलेल्या मार्टिनस वॅन डर ल्युबी नावाच्या एका चोविस वर्षीय डच कामगाराला संसद इमारतीच्या जळत्या दालनाच्या परिसरातून ताब्यात घेण्यात आलं आणि त्यानं गुन्हा कबूलदेखील केला होता. परिणामतः साम्यवाद्यांच्या प्रचंड प्रमाणातील अटकेसोबतच इतरही अनेक संशयित नाझी विरोधी लेखक, पत्रकार, कलाकार, वकील, अहिंसावादी आणि पाद्री, यांनादेखील ताब्यात घेण्यात आलं. त्यांचा मुख्य 'शत्रू' असलेल्या ज्यू समुदायाची बाजू घेणारी नतद्रष्ट जमात म्हणजे साम्यवादी, या भावनेतूनच नाझी साम्यवाद्यांचा तिरस्कार करायचे. त्याच वेळी वाट्टेल त्याला 'राष्ट्रद्रोही' असा शिक्का मारून उचलण्याचं काम सुरूच होतं.

ह्यातील गंमत अशी की, नांबियारचं मूळ भारताच्या दक्षिण-पश्चिम तटावर वसलेल्या त्या केरळ राज्यातील होतं, जिथं नंतरच्या काळात १९४७ साली भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर लोकांनी निवडून

दिलेलं जगातील पहिलं साम्यवादी सरकार अस्तित्वात आलं होतं. नांबियार त्याच्या वयाच्या तिशीत होता आणि त्याचा निःसंदिग्धपणे कल डाव्या विचारसरणीकडे होता. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात प्रेसिडेंसी महाविद्यालय, मद्रास इथलं शिक्षण आटोपून या पठ्ठ्यानं आधी लंडन गाठलं होतं आणि तिथं थोडफार शिक्षण पदरात पाडून घेतलं होतं. त्यानंतर १९२४मध्ये त्यानं बर्लिनकडे प्रस्थान केल होतं. त्याच्या मते युनायटेड किंगडमच्या राजधानीच्या तुलनेत बर्लिन शहर नक्कीच उत्साहपूर्ण होतं. बर्लिनकडे निघतेवेळी त्याच्या मनात भारताविषयी राष्ट्रीयत्वाची भावना रुजली होती. अशी भावना त्याच्या हृदयात फुलायला कारणीभूत होतं ते ब्रिटिश साम्राज्याच्या राजधानीतील त्याच्या मुक्कामादरम्यान प्रथम विश्वयुद्धाच्या समाप्तीनंतर सक्रिय झालेल्या आणि स्वातंत्र्याची आकांक्षा मनात बाळगून असलेल्या असंख्य भारतीय क्रांतिकारकांचं मुखर होणं.

भारतीय स्वातंत्र्याच्या मागणीला ज्यांचं समर्थन होतं अशा युरोपियन समाजवादी तसेच साम्यवादी कार्यकर्त्यांच्या संपर्कात आल्यामुळे नांबियारला डाव्या विचारसरणीविषयी आत्मियता होती. १९२९ ते १९३१ अशी दोन वर्षं विल्हेमस्त्रासा इथं भाड्याच्या दोन खोल्यांमधून नांबियारनं इंडिया इन्फॉर्मेशन ब्युरो (आय.आय.बी.)चं कार्यालय चालवलं होतं. राजकीयदृष्ट्या लंडनकरीता डाऊनिंग स्ट्रीटचं जे महत्त्व आहे तेवढंच महत्त्व विल्हेमस्त्रासाचं जर्मनीच्या राजधानीत होतं. राजकीय घडामोडींचा हा जागरूक अड्डाच होता. या ब्युरोमधून बातम्या देण्याचं आणि विचारांच्या प्रसाराचं आणि प्रचाराचं काम चालायचं. भारतीय स्वातंत्र्य चळवळीची प्रमुख घटक असलेली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय.एन.सी.) या ब्युरोला निधी पुरवठा करीत असे. खरं पाहता, काँग्रेस नेते पं. जवाहरलाल नेहरू ह्यांच्या सांगण्यावरूनच नांबियारनं हा उपक्रम सुरू केला होता. १९२७ साली नेहरू साम्राज्यवाद आणि वसाहतवादविरोधी आंतरराष्ट्रीय काँग्रेसमध्ये सहभागी होण्यासाठी ब्रुसेल्स इथं आले, तेव्हा त्यांची या मल्याळी पत्रकाराशी गाठ पडली होती.[१] इथंच

साम्राज्यवादविरोधी 'लीग अगेन्स्ट इम्पिरिअलीझम'ची (एल.ए.सी.) मुहूर्तमेढ रोवली गेली. ही लीग जागतिक साम्यवादी चळवळीचं अपत्य होतं, असं आपण ढोबळ मानानं म्हणू शकतो. तसं पाहता १९३५ साली एल.ए.सी.चं विसर्जन होईपर्यंत इतर कुठल्याही ठोस कार्यापेक्षा केवळ वादघाल्यांचा एक समूह, अशीच एल.एस.ए.ची ओळख राहिली. ज्याप्रमाणे महान शास्त्रज्ञ अल्बर्ट आइनस्टाइन किंवा लेखक रोमन रोलंड यांसारख्या अनेक साम्यवादी नसलेल्या विभूतींचे या लीगशी संबंध होते, अगदी तसेच नांबियारचेसुद्धा या लीगशी संबंध होते, ह्यात दुमत नसावे. नांबियार हा काही साम्यवादी माणूस नव्हता. त्याच्या बाबतीत फार तर इतकं म्हणता येईल, की १९१७च्या रशियन क्रांतीनंतरच्या दशकात ज्याप्रमाणे जगभरातील असंख्य लोकांना डाव्यांनी जाहीर केलेल्या सामाजिक समानतेच्या तत्त्वाची भुरळ पडली होती, त्यांच्याप्रमाणेच हादेखील त्या तत्त्वाचा एक खंदा समर्थक होता.

या गृहस्थाचा 'लाल बावट्याशी' थेट संबंध आला तो मात्र त्याच्या लग्न-गाठीतून. नांबियारची बायको सुहासिनी चट्टोपाध्याय एक कार्डधारक साम्यवादी स्त्री होती तसंच ती एक प्रतिभावंत भारतीय कवयित्री आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रथम महिला अध्यक्ष सरोजिनी नायडू ह्यांची धाकटी बहीण होती. तरीसुद्धा, डाव्यांच्या मूलगामी चळवळीतील तिचा वाढता सहभाग त्यांच्या वेगळं होण्याच्या कारणांमागील एक कारण ठरलं होतं. तिचा पती तिच्या मागे मागे नक्कीच घरी येईल या भरवश्यावर १९२०च्या दशकाच्या शेवटी सुहासिनी भारतात निघून गेली होती. पण हा गडी बर्लिनलाच थांबला आणि तिथं त्यानं एक बॅव्हेरियन मैत्रीण इव्हा गेस्लरशी संबंध जोडले. सुहासिनीप्रमाणेच तीसुद्धा एक अधिकृत साम्यवादी होती.

नांबियारनं दार उघडता क्षणीच तपकिरी रंगाच्या सदऱ्यातील सहा स्टॉर्मट्रुपर्सनं त्याच्यावर भरलेली रिव्हॉल्वर्स रोखली. काही गडबड केल्यास गोळ्या घालू, या शब्दात त्यास धमकावण्यात आलं. त्यांच्या सोबत बाहेर उभ्या असलेल्या कारपर्यंत चलण्यास त्याला सांगण्यात आलं.

त्यापैकी एस.ए.ची दोन माणसं त्याला खाली घेऊन गेली आणि उर्वरित चौघं त्याचं सामान घ्यायला मागं थांबली. पंधरा मिनिटांच्या अंतरानं ते चौघे खाली आले तेव्हा त्यांच्या सोबत अनेक गाठोडी होती ज्यापैकी एकात नांबियारचं टंकलेखन यंत्र होतं. भारतातील विविध प्रकाशकांना पाठविण्याचे कागद टंकलिखित करून ठेवण्याची त्याला सवय होती; ह्यापैकी उल्लेखनीय नाव होतं मद्रास (आताचं चेन्नई) इथून प्रकाशित होणारं 'द हिन्दू' हे लोकप्रिय इंग्रजी दैनिक.

खाली उभ्या असलेल्या गाडीत त्याला कोंबण्यात आलं आणि गाडी स्थानिक एस.ए. ठाण्याकडे दामटण्यात आली. ते पोलीस ठाणं खचितच नव्हतं. एस.ए.जनी त्यांच्या समांतर कोठड्या तयार केल्या होत्या. ह्याकरीता त्यांनी रिकाम्या वखारी, इमारतींची तळघरं आणि बंद पडलेली गॅरेजेस वापरात आणली होती आणि बर्लिन वासियांकडून लगेचच त्यांचं 'वाइल्ड कॉंसंट्रेशन कँप' असं नामकरण केलं गेलं, जेणेकरून अधिकृत छावण्यांपासून त्यांची वेगळी ओळख व्हावी. प्रवासादरम्यान एस.ए.च्या माणसांपैकी एक गमतीत बोलला की आता कुठं त्यांच्याकडं पुरेशा टंकलेखन मशीन गोळा झाल्या.[२]

एस.ए.च ठाणं एका इमारतीच्या तिसऱ्या माळ्यावर होतं. पायऱ्या चढत असताना दोघा तपकिरी शर्टवाल्यांनी नांबियारला अत्यंत रानटीपणाने चामड्याच्या चाबकाचे फटके लगावले होते.[३] ठाण्याच्या आत गेल्यावर त्याचं सामान असलेली गाठोडी उघडण्यात आली. त्यामध्ये ढीगभर कागद निघाले ज्यात नांबियार भारतावर लिहित असलेल्या एका पुस्तकाचं हस्तलिखित होतं, वर्तमानपत्राची कात्रणं होती, पॉकेट बुक्स, फाइल्स आणि खासगी पत्रव्यवहार होता. त्यात आढळलेल्या भारतीय वर्तमानपत्रांपैकी आणि नियतकालिकांपैकी दोन त्या निरीक्षकांच्या चमूला संशयास्पद वाटल्याकारणानं त्यांना बाजूला काढलं गेलं. त्यापैकी एक कलकत्त्याहून प्रकाशित होणाऱ्या 'कॅपिटल' या साप्ताहिकाचा अंक होता. कार्ल मार्क्सच्या प्रसिद्ध पुस्तकाच्या नावाशी हे नाव जुळत असल्यामुळे ते संशयास्पद ठरलं होतं, याशिवाय दुसरं होतं ते 'इंडियन

टेक्सटाइल जर्नल' आणि या जर्नलचं कठोर परीक्षण होण्याची गरज निरिक्षकांना ह्यासाठी वाटली की त्याच्या मुखपृष्ठाचा रंग लाल होता.

आधी नांबियारला एका कोपऱ्यात बसवण्यात आलं. थोड्याच वेळात त्याच्यावर हल्ला करणाऱ्यांपैकी दोन एस.ए. त्याला त्या ठाण्याचा प्रमुख असलेल्या व्यक्तीकडे घेऊन गेले. 'एक तुच्छतादर्शक हसू चेहऱ्यावर आणत,' नांबियार नंतर केलेल्या या प्रसंगाच्या वर्णनात लिहितो, 'माझ्या उत्तराची वाट न पाहता त्या ठाणेप्रमुखानं असंख्य मूर्खतापूर्ण प्रश्न माझ्यावर डागले' आणि 'भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाविषयी अश्लाघ्य शेरेबाजी केली.'[४] त्याच्या अश्लाघ्य शेरेबाजीचं या पत्रकाराला अजिबात आश्चर्य वाटलं नाही: नाझींच्या उदयाचा तो प्रत्यक्ष साक्षीदार होता आणि पुढे त्यानं नाझींच्या मनात भारत देशाप्रती आणि भारतीयांप्रती असलेल्या तीव्र द्वेषभावनेचाही स्पष्ट उल्लेख केला आहे. त्याच वेळी काही एस.ए.नी नांबियारची झडती घेतली आणि काहींनी त्याच्या फ्लॅटवरून ताब्यात घेतलेला 'गुन्ह्याशी संबंधित' जप्तीचा माल त्यांच्या म्होरक्याच्या पुढ्यात मांडला. त्यानंतर, या भारतीयाला एका दुसऱ्या कोप्ऱ्यात बसवलं गेलं आणि काही नाझी विरंगुळा म्हणून त्याच्या दिशेनं उगाचच 'बोटांच्या बंदुका' रोखत होते.

दहा मिनिटानंतर स्टेशनप्रमुखाने नांबियारला नियमित पोलीस ठाण्यात रवाना करण्याचे आदेश दिले. दारापासून ते कारपर्यंतचं अंतर पार करताना, नांबियारला दोन एस.ए. रक्षकांनी जणू 'जिउ-जित्सू पकड' पद्धतीनं, जी एक जपानी युद्ध-पद्धती आहे, धरलं होतं. या पद्धतीत सशस्त्र शत्रूला नामोहरम करण्यासाठी एक नि:शस्त्र व्यक्ती विविध पकडतंत्र वापरत असते. मार्गात एस.ए.ची माणसं नांबियारची निव्वळ खिल्ली उडवत चालले होते. त्यातील एका रक्षकाने स्वत:च्या फाटक्या विजारीकडे बोट दाखवत या बंद्यास विचारलं की दिवसभर धाडी टाकून माझी ही हालत झाली आहे, या विजारीला रफ्फू करण्यासाठी तू मला एक मार्क (जर्मन चलन) द्यायला पाहिजे. त्यावर दुसरा म्हणतो की ह्याला पोलिसांच्या सुपुर्द करताना मला फार दु:ख होत आहे, कारण

अशा लोकांना द्यायची 'योग्य वागणूक' त्यांना ठाऊकच नसते.

पोलीस स्टेशनला पोहोचल्यानंतर नांबियारच्या अटकेला अधिकृतता देण्यात आली. त्याचा नेक-टाय, बुटांच्या लेस आणि विजारीचे बंध, सर्व काढून घेण्यात आले आणि त्या रात्रीपुरती त्याची विना अंथरुणाच्या केवळ 'बसण्याची व्यवस्था असलेल्या' कोठडीत रवानगी करण्यात आली.

दुसऱ्या दिवशी सकाळी नांबियारला अलेक्झांडरप्लात्झ येथील बर्लिन पोलीस मुख्यालयात नेण्यात आलं. इथे आधीच्या चोवीस तासात ताब्यात घेतल्या गेलेल्या सर्वच आरोपींना अक्षरशः एकापाठोपाठ एक धाडण्यात आलं होतं. एका पोलीस अधिकाऱ्यानं नांबियारच्या व्यक्तिगत माहितीची - जसे नाव, पत्ता अणि व्यवसाय - आदीची नोंद घेतली. इकडे नांबियारवर प्रश्नांचा मारा सुरूच होता त्याच वेळी दुसरा एक अधिकारी अत्यंत 'हर्षोल्लासात' नांबियारला सांगत होता की 'अटकेत असलेल्या सगळ्या राजकीय कैद्यांकरिता फाशीच्या स्तंभांची संख्या दुपटीने वाढविण्यात येत आहे' जेणेकरून त्या सगळ्यांना फासावर लटकवणं सोयीचं व्हावं. तिथून त्याला एका सामान्य कोठडीत नेण्यात आलं, जिथं त्यानं इतर कैद्यांसोबत दोन रात्री घालविल्या. तिसऱ्या दिवशी त्याची रवानगी एका एकान्त कोठडीत करण्यात आली.

नांबियारची भयंकर अग्निपरीक्षा सुरू झाली होती, त्याच शहरात आणि साधारणतः त्याच वेळेला एका दुसऱ्या भारतीयाने त्याच्या फ्लॅटच दार उघडून सुमारे डझनभर स्टॉर्मट्रुपर्सना प्रवेश दिला होता. सगळ्यांची रिव्हॉल्वर्स त्यांच्यावरच रोखलेली होती. हा जय सूर्या होता, सरोजिनी नायडूंचा मुलगा आणि नांबियारची बायको सुहासिनी चट्टोपाध्यायचा भाचा. कवयित्रीच्या चार मुलांपैकी सर्वांत थोरला, बत्तीस वर्षीय जय सूर्या बर्लिन विद्यापीठात वैद्यकशास्त्राचा विद्यार्थी होता.


एस.ए.च्या माणसांना त्यानं त्यांना काय हवं अशी विचारणा केली. 'त्यांनी मला गप्प राहायला सांगितलं, रिव्हॉल्वरच्या दस्त्यानं माझ्या डोक्यावर हाणलं अणि माझ्या खोलीची झाडाझडती सुरू केली,' हा

घटनाक्रम नंतर त्यानं कथन केला.[५]

जय सूर्याची घरमालकीण, जी एक जर्मन होती पण ज्यू नव्हती, तिला स्टॉर्मट्रुपर्सकडून इतकी मारहाण झाली की ती बर्लिन सोडून जी पळाली ती परत न येण्यासाठीच. नायडूलादेखील 'दारुगोळ्याचा पुरवठा आणि साम्यवादी संघटना याबाबत' अत्यंत बोचऱ्या प्रश्नांना सामोरं जावं लागलं होतं. त्याच्या किल्ल्या, पासपोर्ट आणि वैद्यकीय नोंदींचे कागद ताब्यात आल्यासरशी, नायडूच्या सांगण्यानुसार, नाझींनी त्यास खाली ढकललं आणि 'पाच माळ्यांच्या पायऱ्यांवरून चाबकानी फोडत... आणि पट्ट्यानं माझी पाठ आणि मान रक्तबंबाळ होऊन काळी-निळी पडेस्तोवर मारझोड करत नेलं...' मार खाऊन गलितगात्र अवस्थेत असताना टवाळखोर बघ्यांच्या गर्दीच्या पुढ्यात त्यास एका कारमध्ये कोंबून नाझींच्या एका छावणीत ते घेऊन गेले आणि तिथं सुमारे सहा तास प्रश्न विचारून त्यास भंडावून सोडलं. 'पूर्ण वेळ स्टॉर्मट्रुपर्सद्वारा धक्काबुक्की सुरूच होती.'[६] थोड्या वेळात एक साध्या कपड्यातील पोलीस अधिकारी आला आणि त्यानं जय सूर्याला सरकारी पोलीस वाहनामधून बर्लिन पोलीस मुख्यालयात पोहोचतं केलं. तिथल्या कोठडीत त्यानं दोन दिवस घालविले, पण आपल्या मावशीचा नवरा ह्याच तुरुंगाच्या दुसऱ्या भागात आहे या गोष्टीची त्याला कल्पनाच नव्हती. नंतर नायडूची रवानगी तिथून चौदा कि.मी. अंतरावर, बर्लिनच्या पश्चिमेला असलेल्या स्पँडाऊ कारागृहात करण्यात आली.

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## हारीक

**संजीव गिरासे**

पृष्ठे : १५६
किंमत : २५०

*हारीक सांगतं सांगड असावी तत्त्व आणि पैशांची नसावी हाव स्वसुखाची...*

## डाबरं

''कशासाठी?''

''म्हणजे आपली संस्कृती, परंपरा किंवा वहिवाट म्हण हवंतर.''

''कोणती संस्कृती? कुणाची संस्कृती? आणि कसल्या परंपरांचं घेऊन बसला आहेस. खरी संस्कृती आहे मानवता. अरे बाराशे वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरांनी मानवता हा शब्द पसायदानाच्या माध्यमातून

उच्चारला आहे.''

''पण, शेवटी इतक्या वर्षांपासून ज्यांचा पगडा आहे, त्या इतक्या सहजासहजी कशा जातील?''

''कशा जातील म्हणजे? मग अजून किती वर्षं? किती युगे कुरवाळत बसणार आहेस...''

''कालाय तस्मै नमः!''

''म्हणजे काय? काळानुसार स्त्रीचा पुरुष आणि पुरुषाची स्त्री झालीये का? बाभळीच्या झाडाला आंबे लागलेत का?''

''मग, पाहतोस काय तू? अरे डोळे कुठे गेलेत तुझे? अकाली मोतिबिंदू तर नाही ना वाढला? मलातर आश्चर्य वाटतंय...''

''त्यात कसलं आलंय आश्चर्य? अरे जे माझ्या मनाला वाटलं ते सांगितलं...''

''असं कसं रे तुझं मन... दोन बुकं शिकला... निदान त्याची तरी इज्जत ठेव...''

''दोन बुकं शिकलो म्हणून काय शिंगं फुटलीत का? नाही म्हणजे फुटायला हवीत का?''

''बिलकूल. शिंगं फुटलीच पाहिजेत... ती शिंगं मात्र विवेकाची असावीत, ही मात्र मुख्य अट असेल. बुकांमुळे विवेक जागृत होतो.''

''विवेक तर सदैव जागृत असतो प्रत्येकाच्या मनात; पण तो बऱ्याच वेळा का कुणास ठाऊक आपण दाबून ठेवतो. तो प्रकट होऊ देत नाही. कधीमधी अहंकारामुळेदेखील विवेक दाबला जातो.''

''का?''

''त्याचं उत्तर मी सांगतो ना... तो पुरुषी अहंकारात जाणीवपूर्वक दाबून ठेवला जातो आणि घडू नये ते घडतं आपल्या हातून.''

''म्हणजे...''

''याला म्हणतात वेड पांघरून पेडगावला जाणे. सॉरी, पेडगाव म्हणजे स्वार्थाच्या गावी हे अधिक सयुक्तिक होईल... नाही?''

''तू, जे बोलतो आहेस ना ते बोलणं व्यासपीठावरून छान वाटतं

किंवा कुणाला उपदेश करायचा असेल तेव्हा आपली विद्वत्ता सिद्ध करण्यासाठी ठीक आहे. हवंतर पुस्तकात वाचायला हे छान वाटतं; पण प्रत्यक्ष जीवनात? नाही बरं... इतकं सोपं नाही...''

''ही झाली तुझी पळवाट...''

''पळवाट? काहीतरी काय बोलतोस?''

''काहीतरी नाही. खरं तेच बोललो? मिरच्या झोंबल्या का नाकाला? अरे मनात आहे विचार तुझ्या, मग मनाचा कौल घे. असं मनाविरुद्ध दुटप्पी वागलास, तर तुलाच त्रास होणार आहे.''

''तू - मी, मी - तू अशी सरमिसळ बाजूला ठेव आणि मोकळ्या मनानं तुला काय सांगायचं ते सांगून टाक... म्हणजे तुला हलकं तरी वाटेल.''

अचानक माझे डोळे उघडले. मी झोपलो होतो, की माझा डोळा लागला होता, की मी चिंतन करीत होतो? हा माझा स्वत:शी केलेला संवाद होता? काही कळलं नाही. डोकं अगदी गेल्या आठवड्यापासून बधिर झालं आहे. आपण गार्डनमध्ये एका झुडपाखाली बसलो आहोत, की आपल्या घरात बसलो आहोत, याचंही भान नाही. चालणारे चालताहेत. खेळणारी मुलं भान हरपून खेळताहेत आणि आपण? आपणही भान हरपूनच बसलो आहोत. फरक काय त्यांच्यात नि आपल्यात? आपल्या डोक्यातले विचारच संपलेत की काय, असाही प्रश्न पडतो. निरर्थक. आपल्यालाच आपलं कळत नाही... कॉलेजला शिकत असताना वाद-विवाद स्पर्धेत प्रतिस्पर्ध्याला गारद करणारा मी! आता मीच सर्व शस्त्रं टाकून दिली आहेत. अर्जुन झालाय माझा. असं वाटतं आपण शिकायबिकायच्या भानगडीत पडायला नको होतं; पण तीही वेळ गेलीये... काय होईल त्याला सामोरं गेलंच पाहिजे. आईने सुरुवातीलाच मला सांगितलं होतं. पण, आपण? पुरोगामी विचारांनी झपाटलेले. स्त्री-पुरुष समानतेचं भूत आपल्या मानगुटीवर बसलं होतं. स्त्रीला, समाजाने नाकारलेले आणि निसर्गाने दिलेले हक्क दिले पाहिजेत. तिला माणूस म्हणून वागविले पाहिजे वगैरेवगैरे. पळण्यात काही अर्थ

नाही. आईच्या बोलण्याकडे ध्यानच दिलं नाही. आई खूप म्हणायची. ''वल्लं अस्तं तेव्हा त्याचे काठ वयतात. ते सुकलं की फुटतं, तुकडे पडतात.'' दादा, माझे वडील, तेही म्हणायचे,''सारंग, हे जग असं आहे की, बोट धरायला दिलं की मनगट धरतं. मनगट धरायला दिलं, तर खांद्यावर बसतं. मग त्याला खांद्यावरून उतरवणं कठीण होतं.'' होय. अगदी तंतोतंत तसंच घडलंय आपल्या आयुष्यात. तेव्हाच आपण निर्णय घ्यायला पाहिजे होता, जेव्हा रागिणीने विवाहाला विरोध केला होता. विवाहाला म्हणजे...

रागिणी आणि मी पहिलीपासून एकाच वर्गात शिकलो ते दहावीपर्यंत. अकरावीत तिने कॉमर्सला ॲडमिशन घेतली आणि मी आर्ट्सला. दहावीपर्यंत तिचा पहिला नंबर. मी दुसरा किंवा तिसरा. दहावीला तर ती केंद्रात प्रथम आणि मी आमच्या शाळेत दुसरा. बारावीलादेखील ती आमच्या कॉलेजमध्ये पहिलीच होती. पुढे बी.कॉम.ला विद्यापीठात तिसरी. बी.कॉम. नंतर तिने एम.बी.ए. केलं पुण्याला. मी एम. ए. तालुक्याच्या बाहेर पडायची माझी ऐपत नव्हती. तिचे वडील, जी. एल. सर, हायस्कूल टीचर. त्यांचं नाव गंगाधर लक्ष्मण साळुंखे; पण सगळेच टीचर आणि आम्ही विद्यार्थी सरांना जी. एल. सर म्हणायचो. आमच्या वरखेडी गावापासून वीसेक किलोमीटरवर त्यांचं गाव पेरेजपूर. घरची मुबलक शेती, म्हणजे चार औतांची शेती. विहीर बागाईत. तीन भावांपैकी दोन भाऊ नोकरीला. जी. एल. सर हायस्कूलला, तर त्यांचे धाकटे भाऊ प्रल्हाद, हे जि.प.च्या प्राथमिक शाळेत शिक्षक. त्यांचा मोठा भाऊ साहेबराव, गाव, तालुक्याच्या राजकारणातील बडं प्रस्थ. कृषी उत्पन्न बाजार समिती आणि पंचायत समिती सदस्य, असा राजकीय प्रवास. त्याच्या उलट आमची स्थिती. दोन बिघा[१] जमीन. तीही कोरडवाहू. माझे दादा भाड्याचं औत[२] घेऊन शेती करतात. उरल्या वेळात दुसऱ्याची मजुरी. आई माझी बाराही महिने दुसऱ्याच्या मेरवर[३] उभी असते. माझ्यापेक्षा मोठी बहीण सरिता, गावातल्या शाळेत दहावीपर्यंत शिकली. तिचं लग्न करून दिलं. तिचा नवरा सुरेंद्र जिजाजी,

सूरतला कंपनीत कामाला आहे. तिचंही बरं चाललंय. रागिणीची धाकटी बहीण, सुविद्या. धाकटा भाऊ गौरव, त्याचं एम.बी.बी.एस. झालंय. तो जि.प.च्या प्राथमिक आरोग्य केंद्रात मेडिकल ऑफिसर आहे; तर सुविद्याचा नवरा, राकेश ज्यूनिअर कॉलेजला टीचर आहे. अशी आमच्या दोघांची कौटुंबिक स्थिती.

मी एम.ए. करावं, की इतरत्र नोकरी शोधावी, अशा विचारात असताना रागिणीची भेट झाली. ती दोन-तीन दिवसांच्या सुट्टीवर आली होती. ती घरीच आली होती मला भेटायला. पुढे काय करायचं, हा प्रश्न विचारल्यावर मी मनातलं ठरलेलं उत्तर दिलं. तेव्हा तिने स्पष्ट नकार दिला. ''काय करणार आहेस एम.ए. करून? त्यात काय करिअर वगैरे होणार नाही. शिक्षक व्हायचं तर दोन-पाच लाख रुपये डोनेशन द्यावं लागेल. शिवाय बिनपगारी दोन-पाच वर्षं काम करावं लागेल ते वेगळच. त्यापेक्षा एम.बी.ए. का करत नाहीस?'' तापलेल्या लोखंडावर लोहार घणाचे घाव घालतो, ठण् ठण् ठण् ठण् तसे तिचे शब्द माझ्या कानांवर आदळत होते. तिच्या या शब्दांनी मी गांगरूनच गेलो. तिने दिलेल्या सल्ल्यामुळे नव्हे; तर पुण्यात राहून एम. बी. ए. करायचं, या कल्पनेने! सुट्ट्यांमध्ये मजुरी करून मी बी. ए. पूर्ण केलं. अडचणीच्या काळात सरिताचे पती सुरेंद्रदाजी, यांची मदत झाली. पुण्यात राहून तर काय मजुरी करून शिक्षण करता येणार नाही. मी माझी अडचण बोलून दाखविल्यावर रागिणी सहज बोलून गेली. ''ती काळजी तुला नको. मी करते मॅनेज, फक्त तू ठरवं... पुढचं मी पाहून घेईन.''

आता माझ्या मनातल्या विचारांची फडफड थांबली. मी पुण्याला जायचं दादाला बोलून दाखविलं. दादांनी होकार दिला. त्यांचं मत होतं, की माणसाच्या इच्छाशक्तीपेक्षा जगात कोणतीच शक्ती मोठी नाही. आईने कधीच कोणत्याच गोष्टीला विरोध केला नाही. तिची नेहमीच मूक संमती मिळत असते. तिचं मत होतं की, आपली इच्छाशक्ती आणि आपली बौद्धिक, आर्थिक क्षमता यांची सांगडदेखील नेहमीच घातली पाहिजे. हे समीकरण जुळवता आलं, तर यशापासून माणूस दूर राहू

शकत नाही. आता यावर मी काय बोलणार?

दादा, सातवी फायनल झालेले. गावातला हुशार विद्यार्थी, असा लौकिक. पण, गरिबाच्या लेकराला ना मानसिक बळ मिळतं ना प्रोत्साहन. उलट हेटाळणीच मिळत असते. दादा शिकायचं म्हणायचे तर उत्तर मिळायचं ''तू कोठे शिकीस्नी[४] कलेक्टर व्हई जाशी... आपलाआपला साल भर, रोजे-टोजे जाय, पोट तरी भरीन[५]...'' सातवी फायनलला असताना शाळेत फी भरायची होती. कोणीच पैसे उसनवार दिले नाहीत, की व्याजानेही दिले नाहीत. उलट मास्तरला गावातल्या पुढाऱ्याने सांगितलं की, ''फी भरली नाही म्हणून पटावरून नाव कमी करून टाक.'' दादांच्या मायने तिचे कानातले सोन्याचे किल्लू मोडले आणि दादाची फी भरली. किल्लू हा आमच्या खान्देशातल्या स्त्रीचा फार मौल्यवान दागिना असतो. एक वेळा मंगळसूत्र मोडलं तर चालतं; पण किल्लू एकदा कानात घातले, की कधीच काढत नाहीत. अगदी मेल्यावरसुद्धा नाही. प्रेत जळाल्यावर दुसऱ्या दिवशी सारी[६] सरकडायला जातात तेव्हा त्या राखेतून किल्लूचं सोनं शोधून आणतात, अशी ही परंपरा. दादाच्या मायने किल्लू मोडून दादाची फी भरली. केवढा मोठा त्याग आईने मुलासाठी केला होता. आमच्या खान्देशात गरीब, महार, मांग, चांभार, न्हावी, कोळी, सालदार[७] इत्यादींनी आपल्या पायरीप्रमाणे राहावं, वागावं, शिकावं. कपडेसुद्धा आपल्या पायरीनुसारच वापरायचे. माझे दादा त्यांच्या सालदारकीच्या जीवनातली एक आठवण नेहमी सांगतात. त्यांचं नुकतंच लग्न झालेलं. तेव्हा ते आमच्या गावातल्या सर्जेराव दाजभोऽकडे साल भरत होते. लग्नासाठी आठ दिवस सुट्टी दिली होती. सुट्टी म्हणजे आठ दिवसाचे पैसे कापून घेणार होते किंवा आठ दिवस पडतीचे दिवस म्हणून नंतर भरून काढणार होते. दोन दिवसाची लग्नाची नवलाई संपली. दादा कामावर रुजू झाले, तर सर्जेराव दाजभोऽने खत वाहायचं काम सुरू केलं. दादानं एका घटकेत खत-मातीत मिसळले. दुपारी घरी आले, तर आईने त्यांना ओळखलं नव्हतं. तेव्हा हसून दादा म्हणाले होते, ''माडी, सालदारनं आख्खं जीवन शेणमाटीमां

जास.'’’ सातव्या आठव्या दिवशी सुकदेवमामा आईला घ्यायला आला होता. आठ भावंडांमध्ये आई सगळ्यात लहान. सुकदेवमामा लेकुरवाळा होता. दादा कामावरून घरी आले. अंघोळ केली. लग्नाचा ड्रेस म्हणजे पांढरा पायजमा व खमीस घातला. साला-पाव्हणा एकत्र जेवले. आजीने पुरणपोळी- आंब्याचा रस केला होता. आमच्या खान्देशात याला आंबानंजेऊ असं म्हणतात. जेवणं झाल्यावर थोडा आराम करून दादा कामावर निघाले. पाव्हण्यासमोर काय कपडे बदलावेत? लग्नाचे कपडे असे किती दिवस घरात ठेवणार? दादा तसेच त्या कपड्यानिशी कामावर गेले. सर्जेराव दाजभोऽने त्यांना दूरूनच पाहिलं. ‘‘आपल्याकडे साल भरणारा सालदार... आणि बगळ्यासारखे पांढरे स्वच्छ कपडे घालतो?’’ त्यांच्या डोक्यात तिडीकच निघाली. हा सालदार माणूस, असे पांढरे कपडे घालतो जसा की एखादा तालेवार शेतकरी किंवा पुढारी...? दादा म्हणे, ‘‘मी पाहिलं. त्याने शेणपूंजा फेकायचं खिल्लं, त्यात शेण भरलं नि अर्धी बादली पाणी वरून टाकलं. खिल्लं म्हणजे वायवन कपाशीच्या सोट्या उपून त्याचं टोपलं विणलेलं असतं. त्याला सगळ्या फटी असतात. दादा खळ्यात पोहोचले. त्या खिल्ल्यातून शेणाचं गरगट वाहत होतं. सर्जेराव दाजभाऽने दादाच्या डोक्यावर ते खिल्लं ठेवलं आणि दूरच्या उकिरड्यावर टाकायला सांगितलं. या उकिरड्यावर बाजरीच्या बणग्या, दादर, ज्वारीची भुस्सी, हरभऱ्याची काड, आवाया असा कचरा असतो. तो एखाद्या वर्षांत कुजून त्याचं खत तयार होतं. ते खिल्लं मुद्दाम सर्जेराव दाजभोऽने दादाच्या डोक्यावर चढवून दिलं होतं. खिल्लं डोक्यावर ठेवल्यावर त्याच्या सर्व बाजूंनी शेण-पाण्याच्या धारा लागल्या. शेणाचं पाणी पूर्णपणे दादांच्या लग्नाच्या ड्रेसवर टपकलं. आईने अनेक वेळा साबण लावून धुण्याचा प्रयत्न केला. कपडे फाटले; पण ते शेणाचे डाग कधीच निघाले नाहीत.’’ आजही ही आठवण सांगताना दादाचे डोळे ओले होतात.

दादा सांगायचे, आमच्या गावात जवानराव पाटील, गाव कारभारी होते. त्यांना विचारल्याशिवाय आणि त्यांच्या संमतीशिवाय लग्नाची

सोयरीकदेखील व्हायची नाही. पांढरंशुभ्र रेशीमचं धोतर, पांढरं खमीस, डोक्यावर लाल-पांढऱ्या उपरण्याची सालू, मुंडास[१] उजव्या हातात चारही बोटांमधे अंगठ्या, झुपकेदार मिशा, गालावर हनुवटीपर्यंत आलेले कल्ले, कानात भिकबाळी, कमरेला जाड चांदीचा गोफ, पायात मोजडी, हातात बाकदार काठी, असा त्यांचा रुबाब. म्हातारा सत्तरीत पोहोचला तरी अख्खी गावरानी कोंबडी नि तीन बाजरीच्या भाकरी, असा आहार. साठीपर्यंत तालमीत व्यायाम केलेला. पूर्ण गावावर त्यांचा वचक. गावचा न्यायनिवाडा तेच करणार. ज्याचं चुकलं त्याच्या पदरात टाकणार. दुजाभाव कधीच केला नाही. त्यांच्या शब्दाबाहेर कुणी गेलं, तर मारुतीच्या चौकात बोलावून त्याची चामडी सोलणार, असे जवानराव. गाव परंपरेच्या विरोधात कुणी वागलेलं त्यांना खपत नसे. कुणी पायरी सोडलेली आवडत नसे. गावरीतीच्याविरुद्ध कुणी वागलं, तर त्याचं मुस्काट फोडायचे. एखाद्या कारू-नारूने किंवा सालदारने चांगले कपडे घातले, तर भर चौकात अंगावर फाडून टाकायचे. त्यांनी एखादा निर्णय घेतला, तर गाव एकमुखी मान्य करायचं.

मी सुरेंद्रदाजींना फोन केला. त्यांच्याशी चर्चा केली. काहीच हरकत नाही. हा त्यांचा कौल. ''मग खर्चपाण्याचं काय?'' या प्रश्नावर त्यांचं उत्तर, ''इथे, घरी बसून काहीही होणार नाही. पाण्यात पडलं की, आपोआप माणूस हातपाय हलवतो. जगण्यासाठी धडपड मुके प्राणीदेखील करतात. तू तर बुद्धी असलेला तरुण आहेस.'' माझी बोलतीच बंद झाली. स्वामी विवेकानंद शिकागोला गेले. तर, कुठे जायचं? इथून सुरुवात होती. पैसे? आपल्यासारखीच गत होती. तसं तर आपलं नाही. रागिणी आहे. वेळ पडली, तर सुरेंद्रदाजी आहेत आणि माझा विचार पक्का झाला, पुण्याला जाण्याचा!

रागिणीने तिचा शब्द पाळला, ''मी मॅनेज करते.'' म्हणत तिनं खरंच सगळं मॅनेज केलं. तिच्या कंपनीत काम करणाऱ्या बॅचलर पोरांबरोबर राहण्याची सोय करून दिली. डबा त्यांनीच ॲडजेस्ट केला. त्याचे पैसे मला द्यावे लागले नाहीत. एक दोन महिन्यानंतर तिने मला पार्टटाइम

नोकरी मिळवून दिली. एका सी.ए.कडे ऑफिसबॉय म्हणून दिवसातून पाच तास. सकाळी दोन तास, संध्याकाळी तीन तास. महिन्याला पगार साडेतीन हजार. मी माझा शिक्षणाचा, राहण्या-खाण्याचा खर्च भागवून घरी हजार-दीड हजारची मनीऑर्डर पाठवत होतो.

एम.बी.ए. झाल्यावर रागिणीने माझा सीव्ही बनवून घेतला. काही ठिकाणी स्वत:चा रेफरन्स दिला, तर काही ठिकाणी तिच्या फ्रेन्ड सर्कलचा, तर काही ठिकाणी तिच्या कंपनीच्या जी.एम.चा. सीव्ही आठ-दहा कंपन्यांना मेल केला. आठ दिवसांच्या आत मी मुलाखतीस जायला लागलो. मुलाखतीची तयारी तिने करून घेतली. मुलाखत देऊन आल्यावर काय चुकलं वगैरेवर चर्चा करायची. अखेर ब्लूमून या इन्टरनॅशनल कंपनीत मला नोकरी मिळाली. पॅकेज मिळालं दीड लाखाचं! दीड लाख हा आकडा मी कागदावर लिहिला होता. त्याचे प्रत्यक्ष नोटांची बंडलं किती होतील, याचा हिशेब मला किमान वर्षभर तरी मांडता आला नव्हता. पहिल्यांदा पगार मिळाल्यावर प्रत्येक जण करतो तसं मी आई-वडिलांना साडी-धोतरजोडा घेतला नाही; तर रागिणी, माझी गॉडफादर, हो गॉडफादरच म्हटलं पाहिजे. तिला, एका दुकानावर घेऊन गेलो. म्हटलं, ''रागिणी, तुला आवडेल त्या किमतीचा ड्रेस घे... मला खूप आनंद होईल.'' माझे डोळे पाणावले होते. त्यांच्यातून कृतज्ञता झिरपत होती. तिच्या डोळ्यांत? तिच्या डोळ्यांमध्ये कृतार्थतेचा भाव होता. तिचे डोळेबिळे काही पाणावले नव्हते. तिने तिच्यासाठी एक ड्रेस घेतला आणि आई-दादांसाठाही कपडे घ्यायला लावले, आम्ही हॉटेलात जेवलो. ते पैसेही मला द्यायला सांगितले. मला खूप बरं वाटलं. हे सगळं माझ्या कल्पनेपलीकडचं होतं.

दुसऱ्या दिवशी तिने मला माझ्या ऑफिसमध्येच फोन केला. अर्ध्या दिवसाची सुट्टी टाकायला सांगितली. हडपसरला ये म्हणाली फक्त. मला काहीच ठाऊक नव्हतं. मी हडपसरला पोहोचलो. ती वाटच पाहत होती. तिने टॅक्सी बोलावली. आम्ही टॅक्सीत बसलो. तिने ड्रायव्हरला सांगितलं, सिंहगड. मला काहीच अर्थबोध झाला नाही. मी तिच्याकडे

प्रश्नार्थक नजरेने पाहिलं. ती म्हणाली, ''खूप दिवसांपासून सिंहगडावर जाऊजाऊ वाटत होतं; पण मनासारखी कंपनीच मिळत नव्हती. आज आला तो योग.'' तिच्या चेहऱ्यावर समाधानाच्या छटा तरळून गेल्या. खरं आहे. कुणीतरी जिवाभावाचं प्रेम करणारं असावं लागतं. आपणतर बालमित्र आहोत. मला जेवढा सिंहगडाचा इतिहास ठाऊक होता. तो मी सांगितला; पण मी जेव्हा बोलत होतो, तेव्हा तिने असं भासविलं की, ती हा इतिहास पहिल्यांदाच ऐकत आहे. मीही मग फुशारकी मारत आणि इतिहासातलं माझं ज्ञान पाजळत बोलत होतो. तानाजीने सिंहगड कसा जिंकला, हा इतिहास नंतर तिने इतका सविस्तर सांगितला, की मी अचंबित झालो. मला एवढंच माहिती होतं की, कडा चढून तानाजी यशवंतीच्या मदतीने किल्ल्यावर गेला. किल्लेदार उदयभानू रजपूतशी लढतालढता देह ठेवला. गड सर केला. शिवाजी राजांचे उद्गार, ''गड आला पण सिंह गेला!'' किल्ल्याचं नाव कोंढाणा बदलून 'सिंहगड.' वगैरेवगैरे. ह. ना. आपटे यांची कादंबरी, 'गड आला पण सिंह गेला!' रागिणीने वाचलेली. त्यावरून तिने सविस्तर माहिती दिली. वर म्हणाली, ''सारंग, मार्केटिंग क्षेत्रातलं हे गुपित आहे. समोरची व्यक्ती काहीही सांगत असेल तेव्हा आपण चेहऱ्यावर असा भाव ठेवायचा, की आपण जे सांगताहेत ते मी पहिल्यांदाच ऐकत आहे. म्हणजे असं भासवून आपण त्या व्यक्तीचा रिस्पेक्ट करीत असतो. त्याला पूर्ण बोलू द्यावं. मग आपण बोलावं. याने काय होतं, की आपल्या ज्ञानामुळे समोरचा माणूस प्रभावित होतो त्याच्या मनात आपल्याविषयी प्रेमच वाढत असतं...'' असं बरचं काही ती बोलत होती. मी आपल्याला आवडणारं एखादं गाणं ऐकण्यात तल्लीन व्हावं, तसा तल्लीन झालो होतो. तिच्या मुखातून बाहेर पडणारे शब्द, तिच्या चेहऱ्यावरचे भरभर बदलत जाणारे भाव, तिच्या डोळ्यांतला आत्मविश्वास, आवाजातला गोडवा... असं काय सांगू? किती सांगू?...

◆

**१६ एप्रिल ते १५ मे २०२६ दरम्यानचा दिनविशेष**
**दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३० एप्रिल दरम्यान खास सवलत**

**१७ एप्रिल - शशिकांत वामन काळे यांचा जन्मदिन**
'मगरडोह' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

---

**१८ एप्रिल - मीरा सिरसमकर यांचा जन्मदिन**
'हसाल तर वाचाल', 'खुलदाबादचा खजिना', 'नोबेल ललना भाग-१', 'नोबेल ललना भाग-२' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५१०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**१९ एप्रिल - पारू नाईक यांचा जन्मदिन**
'मी का नाही?', 'मोहिनी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३८०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**१९ एप्रिल - जिन ली लेथम यांचा जन्मदिन**
'आगे बढो' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

---

**२० एप्रिल - अजय पांडे यांचा जन्मदिन**
'रेझोनान्स' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२० एप्रिल - सेबॅस्टिअन फॉक्स यांचा जन्मदिन**
'डेव्हिल मे केअर' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**२० एप्रिल - झियाउद्दीन युसफझाई यांचा जन्मदिन**
'लेट हर फ्लाय' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

---

**२१ एप्रिल - ज्ञानदा नाईक यांचा जन्मदिन**

‘तजेलदार कॅनव्हास’, ‘गोष्ट डॉट कॉम भाग १’, ‘गोष्ट डॉट कॉम भाग २’, ‘गोष्ट डॉट कॉम भाग ३’, ‘छोटीशी पाऊलवाट’, ‘खरा गुरू कोण’, ‘राजा, कबुतर आणि वृद्ध’, ‘राजवाडा आणि वन’, ‘सोन्याचं कडं’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २२००/- । सवलत किंमत १६५०/-**

**२१ एप्रिल - ॲलिस्टर मॅक्लीन यांचा जन्मदिन**

ॲलिस्टर मॅक्लीन यांच्या १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४९९०/- । सवलत किंमत ३४९३/-**

**२१ एप्रिल - डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर यांचा जन्मदिन**

‘करवीर छत्रपती इंदुमती राणीसाहेब’, ‘ज्ञानाई सावित्रीबाई फुले’, ‘महाराणी बायजाबाई’, ‘महाराणी येसूबाई’, ‘शिवपत्नी महाराणी सईबाई’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १५००/- । सवलत किंमत ११२५/-**

**२२ एप्रिल - चेतन भगत यांचा जन्मदिन**

‘फाइव्ह पॉइंट समवन’, ‘द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ’, ‘वन नाईट @द कॉल सेंटर’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९००/- । सवलत किंमत ६२४/-**

**२२ एप्रिल - डॉ. बाळ फोंडके यांचा जन्मदिन**

बाळ फोंडके यांच्या १७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४४४५/- । सवलत किंमत ३३८२/-**

**२३ एप्रिल - यशोधरा काटकर यांचा जन्मदिन**

‘बंजाऱ्याचे घर’, ‘थर्ड पर्सन’, ‘अपूर्व, अलौकिक, एकमेव...’, या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४५५/-**

**२३ एप्रिल - जागतिक इंग्लिश भाषा दिन**

‘EASY ENGLISH GRAMMAR AND COMPOSITION’, ‘A Methodical English Grammar’, ‘Fifty Essays’ या पुस्तकांच्या

संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८५५/- । सवलत किंमत ५३१/-**

**२३ एप्रिल - जागतिक पुस्तक दिवस**
५०००च्या खरेदीवर ४०% सवलत. नेट ३०००ची खरेदी बंधनकारक.
एका पुस्तकाची एक प्रत.
**सवलत एक दिवसाकरिता मर्यादित**

**२३ एप्रिल - विल्यम शेक्सपिअर यांचा जन्मदिन**
विल्यम शेक्सपिअर यांच्या २२ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १५००/- । सवलत किंमत १२७५/-**

**२४ एप्रिल - सचिन तेंडुलकर यांचा जन्मदिन**
'चेस युअर ड्रीम्स', 'प्लेइंग इट माय वे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ९९०/- । सवलत किंमत ६९३/-**

**२४ एप्रिल - कल्याणीरमण बेन्नूरवार यांचा जन्मदिन**
'अग्निदिव्य', 'तरंग', 'बसवण्णा', 'अतर्क्य' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १९७५/- । सवलत किंमत १२७०/-**

**२८ एप्रिल - ए. जी. कृष्णमूर्ती यांचा जन्मदिन**
'धीरुभाईझम', 'असामान्य यशप्राप्तीसाठी दहा सामान्य सूत्रे', 'प्रतिकूलतेवर मात' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३५५/- । सवलत किंमत २१३/-**

**२९ एप्रिल - राजा रवि वर्मा यांचा जन्मदिन**
'राजा रवि वर्मा' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३१९/-**

**३० एप्रिल - अरुण शेवते यांचा जन्मदिन**
'चित्तचित्रे', 'मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी!', 'रंगल्या रात्री', 'रात्रंग', 'साहेब संध्याकाळी भेटले...', 'स्वप्नी जे देखिले' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११८५/- । सवलत किंमत ६९९/-**

**३० एप्रिल - जॉन बायेन यांचा जन्मदिन**

‘द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**खालील संचांवर १मे ते १५ मे दरम्यान खास सवलत**

**४ मे - रॉबिन कुक यांचा जन्मदिन**

रॉबिन कुक यांच्या १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६६४५/- । सवलत किंमत ४३१९/-**

**४ मे - डॉ. एस. आर. देशपांडे यांचा जन्मदिन**

‘भारतीय शिल्पवैभव’, ‘भारतीय गणिका’, ‘मराठेशाहीतील मनस्विनी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५९०/- । सवलत किंमत ३२९/-**

**७ मे - रवींद्रनाथ टागोर यांचा जन्मदिन**

रवींद्रनाथ टागोर यांच्यावरील ७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२५०/- । सवलत किंमत ७७३/-**

**८ मे - ध्रुव भट्ट यांचा जन्मदिन**

ध्रुव भट्ट लिखित ८ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २२२५/- । सवलत किंमत १४६६/-**

**८ मे - द. ता. भोसले यांचा जन्मदिन**

‘ग्रामीण बोलीचा शब्दकोश’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १५६/-**

**११ मे - कल्पना कुलश्रेष्ठ यांचा जन्मदिन**

‘इ.स.२५९५’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १५९/-**

**१२ मे - सुप्रिया वकील यांचा जन्मदिन**

‘हाऊज दॅट!’, ‘पॉपकॉर्न’, ‘उत्सव’, ‘स्माइल प्लीज’ या पुस्तकांच्या

संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७४०/- । सवलत किंमत ५५५/-**

**१२ मे - मदर्स डे**

**संच १ :** ‘चिकन सूप फॉर द मदर्स सोल भाग १,२,३’, ‘चिकन सूप फॉर द सोल : इंडियन मदर्स’, ‘करुणाष्टक’

**संचाची मूळ किंमत १०१५/- । सवलत किंमत ६६०/-**

**संच २ :** ‘रुचिरा भाग-१ व भाग-२’, ‘जिच्या हाती पाळण्याची दोरी...’, ‘गर्भसंस्कार’, ‘एक सांगू?’

**संचाची मूळ किंमत १४४०/- । सवलत किंमत ९३६/-**

**संच ३ :** ‘सुखद मातृत्व’, ‘सुखद बालसंगोपन’, ‘माय डॉटर माय मदर’, ‘माझ्या लाडक्या लेकींसाठी’

**संचाची मूळ किंमत ८३०/- । सवलत किंमत ५४०/-**

**संच ४ :** ‘कळेल का ‘त्याला’ आईचं मन?’, ‘माझ्या अम्मीची गोष्ट’, ‘एका मातेचा लढा’, ‘कुंती’, ‘नॉट विदाउट माय डॉटर’, ‘द मदर’, ‘माऊली’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २५४०/- । सवलत किंमत १६५१/-**

**१३ मे - डॅफने ड्यू मोरियेर यांचा जन्मदिन**

‘जमेका इन’, ‘माय कझिन रेशेल’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८२५/- । सवलत किंमत ४४९/-**

**१४ मे - संभाजी महाराज जयंती**

‘संभाजी’, ‘छ. संभाजी : एक चिकित्सा’, ‘छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ’, ‘युवराज संभाजीराजे आणि सती गोदावरी’, ‘छावा’ (नाटक व कादंबरी), ‘छावा’ (इंग्लिश) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४६३९/- । सवलत किंमत ३४७९/-**

◆

# संवाद लेखकाशी






रश्मी बन्सल











**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Round Garden, Vijayanagar Colony, Sadashiv Peth, Pune - 411030.
Publication Date : 11/04/2026 Posting Date : 11/04/2026













## डॉ. जयसिंगराव पवार

**मेहता मराठी ग्रंथजगत**

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति,